
मासिक

# शिक्षणयात्री

■ वर्ष:५ वे ■ अंक: १० वा ■ नोव्हेंबर-डिसेंबर २०२० ■ किंमत:४० रूपये




मराठा बोर्डिंग...
हाती संस्कार शिदोरी
मनी शिक्षणाची वारी
पुण्य सांडीत अव्याहत
चाले माऊली पंढरी ।।१।।
सत्यशोधक साम्यवाद
बहुजन, समानवाद
शिक्षणाची पालखी
नांदले एकाच घरी ।।२।।
संतांच्या बरोबरी
दिंडीत सामील सारी
वीणा टाळ चिपळ्यांसह
दंग अनंत वारकरी ।।३।।
संस्कार हाच विठ्ठल
असे शिक्षण विठ्ठल
सदाचार होई विठ्ठल
विठ्ठल माहेर घरी ।।४।।
- डॉ. पुरुषोत्तम भापकर (भा.प्र.से.)
आदित्य प्रकाशन
अक्षरचित्र-विष्णू थोरे

# अंतरंग...


- ३ दरवर्षीप्रमाणे यंदाही...
- ६ अध्यापन पर्यावरण शास्त्र...
- ९ हे नच पुस्तक,ही तर खिडकी
- १३ जांभळा बेडूक...
- १७ अंतराळातलं तंत्रज्ञान पृथ्वीवर
- १९ दिपोत्सव...
- २१ लॉक डाऊन ची शाळा...
- २५ शिक्षण सुरूच आहे!
- २७ गांभीर्य...
- ३० तंत्रज्ञानाची दीपावली...
- ३२ महात्मा ज्योतिराव फुले...
- ३५ आजचा शैक्षणिक विचार व गाडगेबाबांचे तत्वज्ञान
- ३८ शिकणं आणि शिकवण्यासाठी..
- ३९ कविता...



**वाचन लेखन चळवळीला वाहिलेले मासिक**

वर्ष : ५ वे

अंक:१० वा ▸ नोव्हें-डिसेंबर २०२०

॥ ज्ञानम् सर्वजण हिताय ॥



**● मार्गदर्शक ●**

मा.पुरूषोत्तम भापकर (भाप्रसे)

**● मानद संपादक ●**

सुभाषदादा कुलकर्णी

**● कार्य.संपादक ●**

संदेश नंदकिशोर हजारे

**● संपादन सहाय्य ●**

प्रा.डॉ.माधव कदम

युवराज माने

**●प्रतिनिधी सहाय्य●**

पुणे- रमेश काळे, मुंबई- जयपाल गिरासे, नाशिक-किरण पाटील, सोलापूर- उमेश काळे, औरंगाबाद- रवि गारूडकर, परभणी- युवराज माने, जळगांव- प्रविण माळी, नंदुरबार- तुकाराम धनगर, अमरावती- रूपेश माने, कोल्हापूर - गुलाब बिसेन,सातारा - विनोद भोजने, बीड - अनंत दिक्षित, लातूर - पंढरीनाथ चिभडे,

**● अंक मांडणी ●**

प्रगती आर्टस्,शिरपूर धुळे

- लेखात व्यक्त झालेली मते लेखकांची व्यक्तिगत समजावी
- पीआरबी ॲक्टनुसार कायदेशीर जबाबदारी कार्य.संपादकांची राहील
- सर्व दावे शिरपूर न्यायकक्षेंतर्गत



**मासिका विषयी ...**

नोव्हेंबर-डिसेंबर २०२०

नोंदणी क्रमांक RNI No.MAHMAR2015/67226

वर्गणी : वार्षिक₹ ३५०, द्विवार्षिक₹ ७००, त्रैवार्षिक १०००,



संपर्क : शिक्षणयात्री क्रांतीनगर ता.शिरपूर जि.धुळे ४२५४०५.

चलभाष : 8208301001 Email:shikshanyatri11@gmail.com

संपादकीय



# आहे पणती अजुन...

*अजुनही उजेडावरचा विश्वास ढळलेला नाही.*

*येऊ दया कितीतरी संकटे. मात्र आम्ही डगमगलो नाही नि डगमणारही नाही. असा-तसा नसलेला विषाणू सारं विश्व गारठलेल्या भुमिकेत घेऊन गेला. कोरोनाच्या महासंकटातस सामना कसा करावा नि काय होईल या भितीने थरकाप उडालेला असतांना आपण मात्र धीरानं. खंबीरतेने उभं होतो. त्रिसुत्रीचे पालन करीत होतो आणि आता कोरोनाला थोपवण्यात बरेचसं यश मिळालेलं. पण अजूनही संकट टळलेलं नाही. अंधाराचे सावट अजुनही दिसतेय. म्हणूनच थोडं सबुरीनं घ्यायला हवं मास्क, सुरक्षित अंतर, हात धुण्याचा मंत्र या त्रिसुत्रीला विसरु नका.*

*अजून पणती हाती आहे. उजेडावाचा विश्वास ढळलेला नाही. कोरोना अंधाराला दूर सारण्यात आपली धीररुपी पणती तेवत ठेवायला हवी.*

*दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!*

टिप : शैक्षणिक लेख,विचार,अनूभव,तसेच स्वरचित कथा कविता पाठवावयाचे असल्यास शिक्षणयात्री shikshanyatri11@mail.com या मेलवर पाठवावा. सोबत स्वत:चे नांव,पत्ता,शाळा,पासपोर्ट साईज फोटो पाठवावा. वर्गणी चेक/डि.डी./मनीऑर्डर 'शिक्षणयात्री' या

निमित्त

# दरवर्षीप्रमाणे यंदाही...



**विजय पांढरीपांडे**
हैदराबाद
७६५९०८४५५५

**सरकारी नोकरी म्हटले की पर्मनंट जॉब. म्हणजे तुम्ही काम करा, करू नका, पगारमात्र एक तारखेला नक्की मिळणार. ठराविक काळात पगारवाढ, बढतीही मिळणार. लठ्ठ पगारच नव्हे तर लठ्ठ पेन्शनही मिळणार जन्मभर. आपण नको तिथे नियंत्रण लावणार, नको तिथे गळचेपी करणार, मुसक्या आवळणार. पण काही मोजके कर्तव्य निष्ठ अपवाद वगळता, सरकारी तिजोरीवर बोज, ओझे बनलेल्या राष्ट्राच्या प्रगतीत कसलेही भरीव योगदान न देता फक्त लठ्ठपगार उकळणाऱ्या मंडळींना कसे आवरणार? त्यांना कसा लगाम लावणार?**

दरवर्षी प्रमाणे यंदाही नोबेल पुरस्कार नुकतेच घोषित झाले. दरवर्षीप्रमाणे यंदाही या यादीत भारतीयांचे नाव नाही. त्याची आता आपल्याला सवयही झाली आहे. कुणालाच काही वाटत नाही त्याचे. या पुरस्कारात देखील राजकारण, वशिलेबाजी असते, असे म्हणणारा वर्ग आहे. त्यासाठी 'प्राईज' या कादंबरीचा दाखला देखील दिला जातो. पण म्हणून टागोर, डॉरामन, डॉ रामानुजन यांचे योगदान कमी ठरत नाही. स्वातंत्र्योत्तर काळात ज्या मोजक्या भारतीयाना हा पुरस्कार मिळाला त्यांचे संशोधन कार्यक्षेत्र परदेशातले. काही वर्षांपूर्वी झालेला कैलाश सत्यार्थी यांचा सन्मान हा अपवाद. पण आपले दुर्दैव असेकी त्यांच्या कार्याची ओळख आपल्याला त्यांना पुरस्कार मिळाल्यानंतर झाली. अनेकांना हे नाव माहितीही नव्हते आधी . रामन, रामानुजन, जेसीबोस, एसएनबोस यांच्या तोडीचा एकही शास्त्रज्ञ स्वातंत्र्योत्तर काळात भारतात झाला नाही हे कटुसत्य आपल्याला पचवावेच लागते. आपली इच्छा असोवा नसो.आपल्याकडे प्रतिभा, गुणवत्ता, साधना कमी आहे का? तर तसे मुळीच नाही. मग घोडे कुठे पेंड खाते, या प्रश्नाचे उत्तर शोधणे गरजेचे. आपल्याकडे सीएसआयआर,डीआरडीओ,ईसरो, बीएआरसी, टीआयएफआर, अशा किती तरी नामांकित संस्था आपल्याकडे आहेत. राष्ट्रीय संशोधन प्रयोगशाळा आहेत. या प्रत्येक नावात रिसर्चचा आर आहे. पण तेथे संशोधन, तेही मूलभूत संशोधन, (Basic fundamental research)किती चालते हा खरा प्रश्न. डिझाइन, डेव्हलपमेंट, एक्सटेन्शन, अशी संशोधनाची इतर दुय्यम अंगे आहेत. त्या भरवशावर आपण मिसाईल्स, सॅटेलाईट, न्यूक्लियरपॉवर, अंतरिक्ष तंत्रज्ञान या क्षेत्रात हात पाय हलवले आहेत. आपल्या अंतराळ स्थानकावरून Bva देशांच्या उपग्रहाच्या उड्डाण झाले आहे. पण यातील मूलभूत विज्ञान, तंत्रज्ञान, नॉलेज, टेक्नॉलॉजी, ही बहुतांशी प्रमाणात परकीय, आधी तिकडे झालेल्या संशोधनावरच

आधारित आहे. या तंत्रज्ञान विकासासाठी लागणारे, मटेरियल, इस्ट्रुमेंट्स, तंत्रज्ञान, हे बहुतांश प्रमाणात आयात केले असते. म्हणजे, काही निवडक देशांनी आपल्याला मदत देने बंद केले तर, आपला कारभार ठप्प होऊ शकतो. पंधरावीस टक्के काम आपले ओरिजिनल असेल, पण ते आपल्या वैयक्तिक गरजांपुरते. म्हणजे मूलभूत संशोधनाची टक्केवारी दहावीस टक्के, तेही दहावीस टक्के प्रामाणिक, जागतिक दर्जाचे काम करणाऱ्या निवडक शास्त्रज्ञांच्या भरवशावर. एरवी जागतिक उपयोगाचे ठरेल, साऱ्या विश्वाच्या प्रगतीला साधक ठरेल, असे नाविन्यपूर्ण, अभूतपूर्व संशोधन आपल्याकडे गेल्या काही दशकात विरळाच.

आपल्या आयआयटी सारख्या शैक्षणिक संस्था जागतिक मान्यता प्राप्त असल्या तरी ती गुणवत्ता एकेडमिक, अध्ययनापूर्तीच मर्यादित. जेव्हा केवळ पाच आयआयटीज होत्या, तेव्हा म्हणजे दहावीस वर्षापूर्वी संशोधनाचा दर्जा बरा होता. पण आता भरमसाठ संख्या वाढ झाल्यावर ,एनआयटी, आयआयटीच्या पीएचडी संशोधनाचा दर्जा देखील, परदेशी विद्यापीठाच्या तुलनेत घसरला आहे. परीक्षणाचे नियम कडक होण्याऐवजी शिथिल झाले आहेत. हा दुधात पाणी टाकण्यासारखा प्रकार. शिक्षणक्षेत्रात म्हणा, संशोधन क्षेत्रात म्हणा, खाजगीकरणाने गुणवत्ता वाढेल, स्पर्धा वाढेल हा समज राजकारणी शिक्षणसम्राटांनी खोटा ठरवला. कारण राजकारण अन व्यापारीकरण हेच मूळ उद्दिष्ट ठरवल्यावर बाकी व्हिजन, मिशनही बोधवाक्ये भिंतीवर फाशीला टांगण्यापूर्तीच, शोभेपुरतीच. आपल्या उच्च शिक्षणसंस्था, विद्यापीठं, संशोधनसंस्था या नावापूरत्याच स्वतंत्र, स्वायत्त. त्यावर नियंत्रण मात्र सरकारचे, सत्ताधाऱ्याचे. कुलगुरूच्या नियुक्त्या, प्रयोगशाळाचे निदेशक या ठरणार सरकारच्या, मंत्र्याच्या मर्जीने, वशील्याने. नियुक्तीकरता जर पैशांची देवघेव होत असेल, (काही अपवाद), त्यापुढे दिलेले भरून काढण्याचे प्रयत्न होणारच! भ्रष्टाचार, अंतर्गत जातीपातीचे, पक्षीय राजकारण यापासून आपल्याकडचे कुठलेही क्षेत्रमुक्त, स्वतंत्र नाही. हार्वर्ड, स्टॅनफर्ड, एमआयटी सारखी विद्यापीठं उच्च दर्जाची आहेत, तिथे प्रत्येक विभागात नोबेल विजेते आहेत, कारण त्यासंस्था पूर्ण स्वायत्त आहेत. तिथे सत्ताधाऱ्यांची, देणगीदाराची ढवळाढवळ नाही, हस्तक्षेप नाही. सर्व निवडीचे निकष गुणवत्तेवरच आधारित असतात. कसलेही आरक्षण नाही, कुणाचीही शिफारस नाही. पैसे देऊन प्रवेश, पदवी मिळेल अशी पळवाट नाही. हे सारे जसेच्या तसे आपल्याकडे लागू होईल असे नाही. पण गुणवत्तेशी तडजोड करून चालणार नाही. संशोधनासाठी समस्या हव्या असतात. गरज निर्माण व्हावी लागते. आपल्याकडे तर या दोन्ही गोष्टीची कमतरता नाही. आपल्याकडे आरोग्य, शिक्षण, शेती, दळणवळण, पर्यावरण, ऊर्जेचे उत्पादन अशा सर्वच क्षेत्रात समस्याच समस्या आहेत. प्रत्येक वर्गाच्या वेगवेगळ्या गरजाही आहेत. जितकी सामाजिक,आर्थिक, भाषिक भिन्नता जास्त, त्याप्रमाणात त्या जातीवर्गाच्या गरजा, समस्यादेखील वैविध्यपूर्ण. त्यामुळे संशोधनाला भरपुरवाव.आधुनिक संशोधनाला, नवेविज्ञान, तंत्रज्ञान उपयोगात आणायचे तर भरपूर आर्थिक पाठबळ लागते. त्याप्रमाणात सरकारची आर्थिक तरतूद नसते हेही खरे. पण आर्थिक पाठबळ नसतांना देखील उच्च दर्जाचे, जागतिक मान्यता पावलेले संशोधन आपल्याकडे झाले आहे हेही तितकेच खरे. शंभर सवाशे वर्षांपूर्वी कोलकताच्या लहानशा प्रयोग शाळेत डॉ जगदीश चंद्र बोस यांनी वायरलेस कम्युनिकेशन

संबंधित मूलभूत संशोधन केलेच. अन त्याला जागतिक मान्यताही मिळाली. पण स्वातंत्र्योत्तर काळात बोस, रामन, रामानुजन यांची विदवत्ता, चिकाटी, साधना, निष्ठा कुठे गेली याचाही विचार झाला पाहिजे. आपल्याकडे सरकारी शिक्षणसंस्था, संशोधनसंस्था, प्रयोगशाळा यावर करोडो रुपये खर्च केले जातात. डिपार्टमेंट ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजीचे विभाग लाखो करोडोचे अनुदान देतात. प्रयोगशाळातील वैज्ञानिक, प्राध्यापक, महिन्याला लाख दोन लाख पगार (सातवा आयोग)घेतात. ही मंडळी नेमके काय संशोधन करतात? त्याचे जबाबदारी काय? त्यांचे दायित्व काय? त्यांचा मासिक, वार्षिक आउटपुट काय? त्यांच्या संशोधनाने कुणाचे जीवनमान उंचावले? त्यांच्या संशोधनाचा देशात, राज्यात, शहरात, गावात कुणाला, काय फायदा झाला? त्यांच्या कुठल्या संशोधनाला जागतिक मान्यता मिळाली? याचे ऑडिट कोण करणार? यांना प्रश्न कोण विचारणार? यांचे प्रगती पुस्तक कोण तपासणार?

परिस्थिती बदलायची तर आधी मनोवृत्ती बदलावी लागेल. प्रत्येक क्षेत्रातील राजकारणाची कीड दूर करावी लागेल. उच्च शिक्षण संस्था, राष्ट्रीय प्रयोगशाळा यांना जबाबदारी साठी उत्तरदायित्व स्वीकारावे लागेल. सरकारी योगदानावर अवलंबून न राहता, स्वताचे संशोधन स्वताचे ज्ञान, स्वतःचे प्रोडक्ट विका अन स्वतःचा पगार, बोनस कमवा अशी स्वावयत्ततेची, स्वावलंबनाची नवी जाणीव निर्माण करावी लागेल. हे काम सोपे नाही. पण अशक्य देखील नाही. नाही तर दरवर्षी प्रमाणे यंदाही.. अशीच निराशा पदरी पडेल.



## जागतिक पटलावर ‘शिक्षणयात्री’ लवकरच ...

*होय, शिक्षणयात्री मासिक अल्पावधीत शिक्षण क्षेत्रातील अनुभूतींचं हक्काचं व्यासपीठ झालंय. शैक्षणिक,सामाजिक क्षेत्रातील विचारांना, उपक्रमांना सर्वदूर पोहचवण्यात ‘शिक्षणयात्री’ ला यश मिळालेय.*

*तरीही ‘ऑनलाईन’ काळ पहाता ‘शिक्षणयात्री’ मासिकाने आपला आवाका वाढवण्याचं ठरवलंय. लवकरच जागतिक पटलावर. ‘शिक्षणयात्री’ दिसणार आहे. कधीही कुठेही... संगणकावर.. मोबाईलवर शिक्षणयात्री वेबसाईटच्या माध्यमातून...सोशल मिडीयाच्या माध्यमातून सर्वदूर पोहचणार आहे. नव्या वर्षात...नव्या दमाचं शिक्षणयात्री पहायला आपल्याला नक्कीच आवडेल...*

*-संपादक*

बहुरत्ना वसुंधरा...

# अध्यापन पर्यावरण शास्त्र




**श्री.द.महाजन**
पुणे
७७७४०५६८८०


**पर्यावरण अभ्यासक्र माचा काही भाग चार भिंतीमध्ये, वर्गात शिकवावा लागणार हे उघड आहे. पण डोळे 'उघडे' ठेवून निसर्गाचे निरीक्षण करणे तितकेच महत्वाचे आहे. त्यासाठी कोठेतरी लांबवरच्या गिरीस्थानावरच अभ्याससहल काढण्याची आवश्यकता नसते. आपल्या शाळेच्या घराच्या, आसपासच्या परिसरात हिंडून बऱ्यापैकी निसर्गज्ञान मिळवता येते. गावातील उद्यानात, रस्त्याकडेने, शेताच्या बांधावर आपल्याला अनेक वनस्पती व प्राणी पहायला मिळतात. 'जीविधतेचे' दर्शन घडू शकते.**

कोणत्याही विषयाचे अध्ययन ही एक जोडक्रिया आहे. ही महत्वाची गोष्ट प्रथम लक्षात घेण्याची आवश्यकता आहे. म्हणजे असे की शिकवणे आणि शिकणे ह्या दोन्ही गोष्टी एकाच वेळी घडून येत असतात. परस्पर संवाद साधण्याची ही प्रक्रिया आनंददायी असण्याची गरज आहे. विशेषत: शिकणाऱ्यासाठी ती सुखकारक असावी. त्यासाठी ती मनोरंजक असली तर अधिक परिणामकारक होईल. त्याचवेळी सत्यापलाप होणार नाही याची काळजी घेण्याची मात्र आवश्यकता आहे. अध्यापकाचे विषयाचे ज्ञान आणि पूर्वतयारी शक्य तितकी परिपूर्ण असणे ही आणखी एक अतिमहत्वाची गोष्ट आहे. पर्यावरणशास्त्र हा विषय तर आपल्या जीवनाशीच संबंधित, अगदी 'जीवनमरणाशी' संबंधित असलेला विषय आहे. त्याचा आवाका फार मोठा आहे. त्याचा केवळ एक 'अभ्यास विषय' किंवा अभ्यासक्रमातील 'परीक्षा विषय ' होऊ नये. खऱ्या अर्थाने परिसर ज्ञानविषय, दैनंदिन जीवनाशी निगडीत अभ्यास व्हावा.

हल्ली शिक्षण आणि जीवन त्यांची फारकत झालेली दिसते म्हणजे असे की, वनस्पती शास्त्रच्या पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्याला बहुधा प्राध्यापकालाही त्यांच्या महाविद्यालयाजवळील वृक्षाचे नावही माहिती नसते! प्राणीशास्त्राच्या विद्यार्थ्याला त्यांच्या खिडकीतून दिसणारा पक्षी ओळखता येत नाही! भूगोलाच्या परीक्षेच्या आदल्या दिवशी 'ॲपेलेशियन माउंटन' घोकणाऱ्या विद्यार्थ्याला त्यांच्या गच्चीवरुन दिसणाऱ्या टेकडीचे नाव माहित नव्हते. ध्वनीप्रदुषणावरील दोन मार्कांच्या प्रश्नाचे चारपाच ओळीचे पाठ केलेले उत्तर व्यवस्थित लिहून विद्यार्थी घरी येतो, आणि मोठया आवाजात टी.व्ही. लावतो, दिवाळीत मोठ्या आवाजाचे फटाके उडवतो! शिक्षणाचा उद्देश, त्याचा मूळ हेतू निष्फळ करणारे असे पर्यावरण शिक्षण असू नये.

(बायोडायव्हसिटीला 'जैववैविध्य' हा अवघड शब्द वापरला जातो. चार मात्रा एक वेलांटी आणि एक जोडाक्षर! लागोपाठ तीन 'व' चा उच्चार करण्याची

कसरत! त्यासाठी, उच्चारसौंदर्य आणि लेखनसुलभता यांचा विचार करुन मी 'जीविधता' हा शब्द तयार केला आहे. संस्कृत तज्ज्ञांकडून मान्य करुन घेतला आहे. कृपया त्याचा वापर करावा. वापर सुरु झाला आहे.) ही जीविधता पर्यावरण संतुलनासाठी आवश्यक आहे. आपणही त्याचाच एक भाग आहोत ह्याची जाणीवही विद्यार्थ्यांना करुन देण्याची गरज आहे. 'बहुरत्ना वसुंधरा', 'वसुधैव कुटूंबकम्।' ह्या संस्कृत वाचनांची, तसेच 'Variety is the spice of life' ह्या इंग्रजी सुविचाराचांही विद्यार्थ्यांना जाताजाता परिचय करुन द्यावा, मी तर म्हणतो, "Why only spice? Variety is the Soul of Life!"

परिसंस्था (Ecosystem), अन्न साखळी (Food chain), अन्नजाल परोपजीवी(trohic Web), स्वयंपोषी(Autotrophic), , परपोषी (Parasite) इत्यादी शब्द व संकल्पना समजून देतांना शक्य तेथे नेहमीच्या परिचयाची उदाहरणे देण्याचा प्रयत्न करावा. प्रत्येक वनस्पतीला एक आंतरराष्ट्रीय वनस्पतीशास्त्र नाव (Botanical name) असते, त्याचप्रमाणे प्रत्येक प्राण्याला प्राणीशास्त्रीय नाव (Zoological name) असते, त्याचप्रमाणे प्रत्येक प्राण्याला प्राणीशास्त्रीय नाव (Zoological name) असते. ही नावे लॅटिन नसतात, पण लॅटिन भाषेचे व्याकरण व काही मूळशब्द (root words),वापरुन केलेली असतात. उदाहरणार्थ आंब्याचे नाव आहे. Mangofera आणि मानवजातीचे नाव आहे. Hono Sapiens मनुष्य हा एक प्राणीच आहे. आणि सर्व माणसांचा समावेश शास्त्रीय दृष्टीने एकाच जातीत (Species)केला जातो ह्या गोष्टीही जाता जाता विद्यार्थी मनावर ठसवण्याचा प्रयत्न करावा त्याचप्रमाणे (Mangifera),ह्या शब्दाचे मूळ संस्कृत आहे. त्याचा अर्थ 'मंजिरी(आम्रमंजिरी, आंब्याचा मोहोर) येणारा'आणि indica म्हणजे भारतीय असा असून हे शब्द कसे लॅटिन नाहीत हे समजून सांगावे.

वृक्ष किती महत्वाचे आहेत, त्यांचे किती उपयोग आपल्याला होतात हे अभ्यासक्रमात शिकवले जातेच. मानवाच्या विविध उपक्रमांमुळे प्रचंड प्रमाणात जंगलाचा ऱ्हास झालेला आहे. वृक्षतोड झालेली आहे. त्यामुळे वृक्षलागवडीचे महत्व किती आहे हे सविस्तर सांगितले जाते. त्यासाठी 'वृक्ष लावा', 'वृक्ष जगवा' अशा घोषणांचा मारा प्राथमिक बालमनांवर केला जातो. मोठया वृक्ष लावायला व जगवायला पाहिजेत हे खरेच आहे. ज्यांना ते जमेल त्यांनी ते करावेच. पण अशा घोषणांचा फारसा सुपरिणाम होताना दिसत नाही. दुसरी एक गोष्ट म्हणजे वृक्षलागवड ही एक तांत्रिक प्रक्रिया आहे. कोणत्या वृक्षजातीची रोपे कुठ लावायची, ती कुठून आणायची. केव्हा व कशी लावायची इत्यादी गोष्टी सर्वांना जमण्याजोग्या नसतात. काही वृक्षांच्या बिया सहज मिळविण्याजोग्या असतात. त्या गोळा करणे कोणालाही, अगदी प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यालाही सहज शक्य असते. उदाहरणार्थ बाबळ आणि करंज, यांच्या असंख्या बिया रस्तोरस्ती पडलेल्या असतात विद्यार्थ्यांनी त्या गोळा करुन आणाव्यात प्लॅस्टिक पिशव्यात बियांची रोपे तयार करणे, ती वाढवणे, शासनाने, पालिका महापालिकांनी, निसर्गप्रेमींनी लावलेल्या वृक्षरोपांना पाणी घालणे अशी कामे विद्यार्थी सहज करु शकतील, आवडीने करतातही. ती त्यांना सांगावीत.

इंग्रजीमध्ये एक म्हण आहे. 'मनी सेव्हड् इज मनी गोल्ड' त्याचप्रमाणे अस म्हणता येईल की, 'ट्री सेव्हड् ट्री प्लॅण्टेड्!' वृक्ष वाचण्याचं काम आबालवृध्द प्रत्येकजण अगदी सहजपणे करु शकतो. कागद वाचवणे, कागदाचा काटकसरीने वापर करणे, पुनर्वापर करणे म्हणजे अप्रत्यक्षपणे वृक्ष वाचवणे हे

विद्यार्थीवर्गाच्या मनावर ठसवणे फार महत्वाचं आहे. सर्वच निसर्गस्त्रोतांचा वापर काटकसरीने करणे निसर्ग बंधनाला हातभार लावणारे असते. महात्माजी म्हणायचे, 'निसर्ग आपल्याला आवश्यक त्या गोष्टी आवश्यक तेवढया प्रमाणात द्यावला समर्थ आहे,आपली हाव व हव्यास भागवायला नाही.' (नेचर इज केपेबल टू सप्लाय दि नीड्स ऑफ एव्हरीबडी , बट नॉट दि ग्रीडस् ऑफ एनीबडी) अन्न, पाणी, ऊ र्जा म्हणजे. मुख्यत: वीज यांचा कमीत कमी व काळजीपूर्वक वापर ही काळाची गरज आहे.असं अजून कितीतरी सांगण्याजोगं आहे. प्रदुषण, जागतिक तापमानवाढ, हवामानाबद्दल, लोकसंख्यावाढ, कुटूंबनियोजन इत्यादी अनेकानेक संकल्पनांची तोंड ओळख तरी विद्यार्थ्यांना करुन द्यावी.

## मुखपृष्ठाविषयी...

### हिच का ती पुस्तके...?




*टिचभर पोटाची खळगी भरण्यासाठी चिमुकल्यांनी अकाली मोठेपणा स्वीकारलाय. दोन पैसे मिळवण्याची जबाबदारी घेऊन काहितरी करायला निघालेल्या या चिमुकल्यांचे बालपण, मात्र हरवल्याचं दिसतय. ज्या पुस्तकांनी जीवनाचं सार शिकवायचंय तीच पुस्तके कमावण्याच्या (पुडी बांधण्याच्या ) कामी पडल्याचं समाधान त्यांच्या चेहऱ्यावर झळकतंय.*

*कोरोनाच्या महाभयंकर संकटात तीन चार महीने सारं ठप्प. साऱ्यांचा आर्थिक तोल ढासळला. व्यवसाय बदलले. पैसे कमावण्यासाठी निरनिराळे मार्ग स्वीकारले. शहरी भागात नि ग्रामीण भागातील परिस्थिती निराळी. त्यातच आदिवासी भागातील व्यथा वेगळयाच. पण लोकही स्वाभिमानी. शासनाचे नियम तंतोतंत पाळण्याची खबरदारी घेतल्यानेच कदाचित कोरोनाला आदिवासी भागात शिरकाव करता आला नसावा.*

*टाळे बंदी शिथील झाल्यानंतरचे हे चित्र. मंदिरे तर बंद आहेतच. तरीही भाविक बाहेरुन का होईना दर्शनासाठी आलेले. अशावेळी दोन पैसे कमावण्याची जबाबदारी नि संधी आलेली. शाळा तर बंद. एरवी उपक्रमांच्या नावाने खरेदी-विक्री, नफा-तोटा शिकता येतो. आता मात्र प्रत्यक्षात व्यवहार करायचा. घरच्याच भुईमूगाच्या शेंगा,झेंडूची फुले घेऊन विकण्यास तयार असलेली मुले . जास्त भांडवल नाही कि चिंता नाही . आहे त्यांत भागवायंचं या समाधानी विचारानं दुकानदारी शुरु.*

*आलेल्या भाविकांना विनवणं, शेंगा-हार घेण्यास भाग पाडणं, पैसे देणे-घेणं, या कौशल्यांबरोबरच जीवन जगताहेत. पुस्तकीज्ञानापासून दूर. पुस्तकांच्या फाडलेल्या पानातच शेंगा देताना पाहून हिच का ती पुस्तके? ज्या पुस्तकांनी जीवन कौशल्येची ओळख होणार होती. आकडेमोड शिकणार होतो. वाचता येणार होते. प्रश्नाची उत्तरे देता येणार होती आणि तीच पुस्तके फाडून, पानं मोकळी करुन दोन पैसे विकण्याची साधन व्हावीत?*

वर्ग पहिली ते सातवीपर्यंतच्या लेकरांची वाचनाचा आनंद सोहळ्यात उपस्थिती लागू लागली.नित्यनेमाने वेगवेगळ्या पुस्तकांची, कथांची ,कवितांची मेजवानी मुलांसाठी मिळू लागली.जे पाठयपुस्तकात आहे ते विद्यार्थ्यांसमोर विषद करण्याची जबाबदारी शिक्षकांची असतेच पण जे पाठ्यपुस्तकात नाही पण विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वात आहे ते ओळखण्याचा व आपल्या परीने फुलविण्याचा गुण शिक्षकांमध्ये असायला हवा. हे पुस्तक वाचनाच्या माध्यमातून लक्षात येऊ लागलं.

# हे नच पुस्तक, ही तर खिडकी

आनंदाचं झाड



**युवराज माने**
जि.प.शाळा पार्डी
७५१७४७८५७०




आमच्या विद्यार्थ्यांला एकेक शब्द म्हणजे एकेका मौल्यवान रत्नाच्या प्राप्तीसारखा वाटायला हवा. एकेक शब्द जाणणं म्हणजे एकेक नवा मित्र जोडणं असं मानायला हवं.नवे शब्द आत्मसात करणं म्हणजे आपला शब्दसंग्रह नव्हे तर लोकसंग्रह वाढवणं असं समजायला हवं...

जाणिवांच्या बिया पेरण्याचे काम सातत्याने चालू होतं. तर काही बीयांना सूर गवसला होता. सकारात्मकतेचे अंकुर फुटताना दिसत होते.एक एक पाऊल प्रगतीच्या दिशेने पडत होतं.तांड्यावरील झोपड्यांच्यासमोर दिव्याच्या लख्ख प्रकाशाच्याखाली आता आमची 'आनंदाची झाडं' गटागटाने अभ्यास करत बसू लागले. यापूर्वी कधीही रात्रीच्यावेळी आमच्या तांड्यावरील झोपड्या लख्ख प्रकाशात उजळल्या नव्हत्या;नाही रात्रीच्या वेळी मुलांच्या अ आ इ. पाढे व कवितांचा गजर कधी त्यांनी ऐकला होता.लहान-थोरासह सर्वांना रात्रअभ्यासिकेचं कुतूहल होतं.घरातील आजी आजोबा आपल्या

नातवांना असं अभ्यास करताना पाहून सुखावून जात होते.हळूहळू मुलांची शाळेतील उपस्थिती वाढू लागली. हे शिक्षकांच्या धडपडीसोबत उपक्रमांची कमाल होती.एक एक उपक्रम आमच्या शाळेत लाख मोलाचा ठरू लागला.आमच्या तांड्यावरील मुलं म्हणजे चपळ ,चंचल आणि उद्योगी. त्यामुळे त्यांना वेगवेगळ्या कृतीमध्ये रस असायचा. हे हेरून तशा प्रकारच्या कृती- उपक्रम सुचू लागले व त्याची निर्मिती होऊ लागली.

मी शिक्षक म्हणून नोकरीत रुजू झालो खरा;पण शिक्षक म्हणून माझा खरा जन्म तांड्यावरील या मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणताना झाला. शिक्षक म्हणून जन्म होण्याचा एक क्षण असतो तो काही जण शिक्षक असूनही त्यांच्या आयुष्यात येत नाही.' ज्या तांड्यावर वर्षातील सहा-सात महिने केवळ म्हातारी माणसं व काही कोवळी मुलं वास्तव्य करून असतात त्याचवेळी शाळेतील काही मुलं व त्यांची पालक गावापासून कोसो दूर उसाच्या फडात रात्री-अपरात्री ऊस तोडायलेली असतात.आर्थिक दुर्बलता आणि शैक्षणिक अज्ञानापोटी मुलांचे शिक्षण थांबल्या जायचं. परंतु गावातील माऊली राठोड व इतर जाणकार युवकांच्या पुढाकाराने ऊस तोडणीस जाणाऱ्या मुलांना थांबवण्यात व रात्र अभ्यासिकेत रमण्यात यश प्राप्त झालं.

बालपणी ऐकलेल्या गोष्टीमधूनच मोठेपणीच्या वाचनाची पूर्वतयारी होत असते.'पुस्तकात मजा' असते हे कळल्यास मुलं पुस्तकाकडे आकर्षित होतात व गुरुजींनी वाचून दाखवलेली पुस्तके त्यांना स्वतः वाचावीशी वाटतात.' हे मी मागील अनुभवावरून जाणून होतो. शाळेत येताना स्वतःच्या संग्रहातील, मुलांना आकर्षित करणारे पुस्तक सोबत आणू लागलो. परिपाठात पुस्तकाविषयी बोलू लागलो. दुपारच्या सुट्टीत स्वतः वाचत बसू लागलो.टेबलवर दर्शनी भागात पुस्तकं मांडू लागलो.मुलं जाता येता पुस्तकावर नजर ठेवून असायचे.मी बाहेर गेल्यास पुस्तक स्वतः उघडून पहायचे.एके दिवशी राधा म्हणाली, गुरुजी आम्हाला हे पुस्तक वाचून दाखवा ना! माझा उद्देश सफल झाला. मला एक सुखद धक्का मिळाला. निष्ठेने केलेले काम किती प्रेरणादायी असते याचाच वस्तुपाठ म्हणजे शिक्षकाचे जगणे होय. ह्याची परत एकदा जाणीव झाली.त्याच दिवशीपासून दुपारी जेवणाच्या सुट्टीनंतर आमच्या आनंदाच्या झाडात 'वाचनाचा आनंदसोहळा' सुरू झाला.

'तोतोचान' हे आमच्या आनंदाच्या झाडातील पहिलं पुस्तक ठरलं जे आमच्या लेकरांच्या वाचन गोडीसाठी व शाळेचा लळा लावण्यासाठी उपयुक्त ठरलं. जेवणाच्या सुट्टीनंतर लेकरं पटापटा येऊन बसू लागले. तोतोचान आणि तिच्या शाळेतील गंमती-जमती आमच्या मुलांना इतक्या भावल्या की, लेकरं दररोज उद्या काय होईल? पुढे काय झालं असेल? अशी चर्चा करू लागले.तोमोई विद्यालयातील गुरुजी आणि मुलांचं नातं आमच्या मनाला स्पर्श करून गेलं. या पुस्तकातून केवळ वाचन गोडी लागली नाही तर मुलांना शाळाविषयी व गुरुजींप्रति एक वेगळाच लळा लागला. बघता बघता वाचन सोहळ्यातील विद्यार्थ्यांची संख्या शंभरीच्यापुढे गेली. वाचन आणि लिखाण हा माझा श्वास आहे असं गिरिजा कीर का म्हणत असतील याचं गुपित कळून चुकलं.

'चीपर बाय दी डझन' हे पुस्तकही आमच्या मुलांना खूप भावलं याविषयी विद्यार्थ्यांनी भरून प्रतिक्रियाही दिल्या. एवढेच नाही तर राधा शेळके या चिमुकलीने या पुस्तकाचं परीक्षणही केलं.जे किशोर मासिकात प्रकाशित झालं.अभिवाचनासोबत शिदोरी, अमृतकण, चला अमृतकण वाटुया. असे उपक्रमही

सोबत सुरु झाले. यातून मुलांना पुस्तकात काय असतं. पुस्तकातून त्यांना काय मिळालं याचा अंदाज येऊ लागला. त्यांच्या ज्ञानाच्या कक्षा रुंदाऊ लागल्या.

लेकरांना एकदा कळलं की,वास्तव काय असतं.मला आयुष्यात कसं यश मिळवायचं ,माणसं आयुष्यात कसं यश मिळवतात, स्वतःची वाट स्वतः कशी धुंडाळतात. तर त्यांचा पुढचा प्रवास सोपा होतो. उत्तम कांबळे यांचं आत्मचरित्र 'वाट तुडवताना' वाचताना तर आमच्या आनंदाच्या झाडातील अनेक मुलांच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागले. ही पुस्तकाची किमया! मुलांच्या हृदयाला लेखकाच्या जीवनातील अनेक भीषण प्रसंग भिडले होते.अशाही परिस्थितीत एखादा व्यक्ती यशाचं उत्तुंग शिखर गाठू शकतो ही मोठी प्रेरणा पुस्तकातून मिळाली. शाळेतील वीस-पंचवीस मुलांनी उत्तम कांबळे यांना आपल्या प्रतिक्रिया पत्रातून व्यक्त केल्या. एवढेच नाही तर चलभाषवरून त्यांच्याशी संवाद साधला. पुस्तकाच्या माध्यमातून एका उत्तुंग उंचीच्या माणसाशी माझ्या लेकरांचा संवाद होणे ही मोठी उपलब्धी होती.

'कोऱ्या पानावर जेव्हा कुणीतरी प्रेरणा देतं तेही मग किती उर्जादायी वाटतं' पुस्तकातील अशा कोऱ्या पानावर लिहिलेल्या मजकुराच्या माध्यमातून माझी लेकरं जगाकडे पाहू लागले.अनेक प्रेरणादायी मजकूर लेकरांच्या पंखात बळ भरू लागली. दररोजच्या वाचनात अनेक प्रेरणादायी व्यक्तिमत्व दररोज मुलांशी संवाद साधू लागले. पुस्तकाच्या माध्यमातून जगाकडे पाहण्याची एक खिडकी त्यांच्यासाठी खुली झाली. 'साहित्य अकादमी पुरस्कृत आसाराम लोमटे लिखित आलोक 'कथासंग्रह मुलांना वाचून दाखवताना एक वेगळीच मजा त्यांच्या साहित्यातून मिळाली.आसाराम लोमटे व इंद्रजीत भालेराव ही जोडगोळी आमच्याच मातीतील असल्याने त्यांच्याविषयीचं एक वेगळंच आकर्षण आमच्या मुलांना होतं.इंद्रजित भालेराव यांच्या कविता मुलांच्या ओठावर सतत आजही घुटमळत असतात..आता मुलं स्वतः म्हणतात, सर, आता पुस्तकाशिवाय करमतच नाही! हाच माझा खरा विजय होय.

'पोपट उडाला भुर्रर' हा रा रं बोराडे यांचा कथासंग्रह मुलांना फार भावला. मुलांनी त्याविषयी सविस्तर पत्र लिहून त्यांना कळलं. याचं बोराडे सरांना फार कुतूहल वाटलं.मुलांसाठी त्यांनी बक्षीस म्हणून पुस्तकांचा खजिना पाठवला. मग तर मुलांच्या आनंदाला पारावार उरला नाही. अशाच प्रकारे टीचर, द अल्केमिस्ट, जिथे मुलांना पंख फुटतात, चकवा-चांदणं सृजन शाळा, कोसबाडच्या टेकडीवरून, अग्निपंख, देणारं झाड पाखरावर प्रेम करणारा पर्वत, गोष्ट आलियाच्या ग्रंथालयाची,अमर पत्र,तूच काग माझी आई , माय कंट्री स्कूल डायरी, माझे जीवन, अदम्य जिद्द, उंबरठ्यावरचे दिवस, हाती ज्यांच्या शून्य होते, शब्दांचे धन, रानबखर, बदल पेरणारी माणसं,प्रेरणा, अशा कितीतरी पुस्तकांचे अभिवाचन वाचनाचा आनंद सोहळ्यात होत गेले. यातूनच आमच्या शाळेचं शाळेतील आनंदाच्या झाडांचं महाराष्ट्रातील अनेक मान्यवरांशी समृद्ध नातं जुळलं.... ज्यामध्ये डॉ. आ ह साळुंखे, सतीश काळसेकर, प्रवीण दवणे, रा रं बोराडे, गजानन थत्ते, उत्तम कांबळे, भाऊ गावंडे, लीलाताई शिंदे, किरण केंद्रे, बाबाराव मुसळे, बबन शिंदे, नीलांबरी जोशी, अश्विनीताई माने,विजयाताई हिरमेट, प्रदीप माने, गुलाब बिसेन, पुरुषोत्तम भापकर, अभिजीत जोंधळे, आसाराम लोमटे,इंद्रजीत भालेराव, अनिता येलमटे, हेरंब कुलकर्णी, मयूर दंतकाळे, मयूर जाधव, सचीन पाटील, कल्पना दुधाळ,संदेश हजारे, आबा महाजन, डॉक्टर संध्या पवार, प्रमोदकुमार अणेराव, अशोक

चेपटे, माणिक पुरी, पृथ्वीराज तौर, अशा नामवंत प्रतिभावंत मान्यवरांशी भेटण्याची पुस्तकाच्या द्वारे एक खिडकी उघडी झाली ज्या खिडकीतून माझी लेकरं जगामध्ये डोकावून पाहू लागले.

हे केवळ पुस्तकचं नसून जगाकडे पाहण्यासाठीची एक उत्तम खिडकी आहे हे आम्हाला आमच्या वाचनाच्या आनंद सोहळ्यातून कळालं.तांड्यावरील आमच्या चार भिंतीच्या शाळेतून आम्ही पुस्तकाच्या माध्यमातून जगातील या मान्यवरांशी संवाद साधू लागलो. यातील अनेक मान्यवरांनी आमच्या या चिमुकल्यांसाठी खूप मोठ्या प्रमाणात शब्दांचे धनही पाठवलं.मुंबई येथे वास्तव्यास असणारे गजानन थत्ते हे व्यक्तिमत्व आम्हाला परीसरूपात भेटलं ज्यांनी इतरत्र कुठेही मिळणार नाहीत असे अमूल्य पुस्तक पाठवली. मराठीच नाही तर इंग्रजी साहित्यातील अप्रतिम साहित्यकृतीही त्यांनी आम्हाला पाठवल्या. दिगंबर गाडगीळ, धनश्री करमरकर, विजयाताई हिरेमठ, आदी मान्यवरांनीही मुलांसाठी भरपूर वाचन शिदोरी पाठवली त्यातून सर्व मुले समृद्ध होत आहेत हे केवळ पुस्तकाच्या माध्यमातूनच होऊ शकलं....

हे नच पुस्तक, ही तर खिडकी
जग भवतीचे बघण्यासाठी...
हे नच पुस्तक, ही तर दुर्बिण
अदृश्याला भिडण्यासाठी....



# जांभळा बेडूक...

आम्ही आहोतच वेगळे



डॉ.नंदा हरम
विज्ञान प्रसारक,पुणे
९३७२९९०३०६

हा बेडूक ही जांभळया रंगाचा, निळया डोळ्यांचा असतो. जमिनी खालीच रहतो. परंतु हा बेडूक आनुवंशिकरित्या व शारीरिक रचनेच्या दृष्टीने सह्याद्रेसिस पेक्षा वेगळा असतो. याच्या प्रजोत्पादनाचा काळ ऑक्टोंबर ते डिसेंबर हा आहे.

आई: एवढा फरक? म्हणजे ते जिथे सापडतात, तिथे पावसाळ्याचे दिवस वेगळे आहेत की काय?

महेश: कसं ओळखतंस ,आई? या दोन्ही जाती पश्चित घाटातच पण दोन वेगवेगळया ठिकाणी आढळतात, जिथे पावसाचे दिवस वेगवेगळे आहेत.

आई: महेश, एवढा कशात तल्लीन झाला आहेस? पोहे थंड होत आहेत. खायला ये बरं लगेच.

महेश: आई, खूप छान माहिती मिळाली मला. काल ना...

(मध्येच थांबवत) आई : बाळा, पोहे खातांना सांग सारं...

महेश : बरं....

थोड पोट भरेपर्यत महेश गप्प बसला. मग झाली त्याची सुरुवात.

महेश: आई... काल विज्ञानाच्या बाई आम्हाला बेडकाच्या जीवनचक्राची माहिती सांगत होत्या.

आई :त्यांच्या जीवनचक्राच्या किती अवस्था असतात?

महेश : चार! सर्वप्रथम अंडी, त्यातून टॅडपोल बाहेर पडतात

मग...

आई : थांब, टॅडपोल कुठे असतो? त्याला कोणते अवयव असतात.

महेश : जेव्हा अंडयातून टॅडपोल बाहेर येतो, तेव्हां तो माशासारखा दिसतो. त्याला पाय नसतात. कल्ले असतात. पाण्यात त्या कल्ल्यांच्या सहाय्याने श्वसन करतो

आई: व्वा... पुढे...

महेश : तो पाण्यात पोहतो. पाण्यातील शेवाळ, वनस्पती हे त्याचं अन्य असतं. काही आठवडे त्याची अशी वाढ होते. मग हळुहळु फुफ्फुसांची वाढ होते. मागचे दोन पाय फुटतात, त्यामुळे थोड थोड खुरडत चालू शकतो. त्याची शेपटी असुन तशीच असते.

आई : बाई सांगत होत्या, तेव्हा चांगलं लक्ष होतं तुझं!

पण तू कसली माहिती शोधत होतास?

महेश : अरे हो... ते सांगायचंच राहिलं. बाई आम्हाला म्हणाल्या की आपल्या देशात एक बेडूक असा आहे की त्याच्या टॅडपोलला शोषक असतं आणि तो बेडूकही वेगळा आहे.

आई: आहे का असा बेडूक?

महेश: हो, जांभळा बेडूक...

आई : जांभळा बेडूक! मी तर पहिल्यांदाच ऐकते आहे.

महेश:(आकृती क्रं.१ पहा) आई, या बेडकाचं

शास्त्रीय नाव आहे 'नेसिकॉक्ट्राशिअस सह्याड्रेन्सिस'



आकृती क्र. १: जांभळा बेडूक

(Naikabetrachus sahadrenis)

आई : बापरे! एवढं कठीण?

महेश: आई, अजिबात कठीण नाही. त्याची फोड करुन सांगतो संस्कृतमध्ये नासिका म्हणजे नाक, बॅट्राकस(batraches) या ग्रीक शब्दाचा अर्थ बेडकू आणि हा बेडूक सह्याद्रीत म्हणजे पश्चिम घाटात सापडतो म्हणून सह्याड्रेन्सिस.

आई : व्वा! फारच सोपं आहे, लक्षात ठेवायला. बेडकाचा समोरचा भाग नाकासारखा दिसतो ना!

महेश: हो... त्याला 'पिगनोंज फ्रॉग' (Pignase Frog)म्हणूनही ओळखलं जातं.

आई : हल्लीच या बेडकाविषयीची माहिती मिळाली का?

महेश: अग्, १९९८ सालीच याच्या टॅडपोलवरुन जीवशास्त्रीय वर्गीकरण केलं होतं. पण सारं दुर्लक्षित राहिलं. हल्ली २००३ साली केरळमधील इडुक्की जिल्ह्यात हा बेडूक सापडला आणि त्याचा अभ्यास केला गेला. हा नकाशा बघ.

(आकृती क्र.२ पहा), यात जो केशरी भाग दाखवला आहे ना इथे हे बेडूक आढळतात.

आई: हा जांभळा बेडकू किती विचित्र दिसतो




आकृती क्र. २: केशरी पट्टा: जांभळ्या बेडकांचे वास्तव्य

नाही, महेश! मग तो संशोधकांच्या लक्षात कसा आला नाही?

महेश: अग, त्याचं वास्तव्य जमिनीखाली असतं. फक्त पावसाळयात प्रजोत्पादनाच्यावेळी साधारण २आठवडे तो जमिनीवर येतो.

आई : बरं... बरं... आलं लक्षात.

महेश: पावसाळयात एखाद्या झऱ्याजवळ हे तर बेडूक जमिनीखालून वर येतात. आवाज करत मादीला आकर्षित करतात. मादी साधाला ३००० अंडी या पाण्यात घालते.

आई: अंथातून बाहेर येणारे टॅडपोल पाण्यातच असतात ना?

महेश: आई, या बेडकाचे टॅडपोलच वैशिष्टपूर्ण आहेत.

आई: ते कसे? कोणत्या दृष्टीने?

महेश: टॅडपोलची जेवढी लांबी असते, तेवढंच

त्याचं डोकं रुंद असतं.

(आकृती क्रं.३ पहा) या टॅडपोलची वाढ होत जेव्हां जमिनीखाली जायची वेळ येते, तेव्हा त्यांच्या डोक्यातली कवटी मागील बाजुला रुंद होऊन पुढे



आकृती क्र.३: टॅडपोल

निमुळती होत जाते. जमनी उकरण्याकरिता हा आकार उपयोगी पडतो.

आई: महेश, तु सुरुवातीला म्हणाला होतास ना की टॅडपोलला शोषक असतं. ते किती दिवस रहातं?

महेश: अग, टॅडपोलची वाढ होत असताना ते शोषक तसंच रहावे. त्यांच्या पायाची हाडं वाढतात, कठीण होतात, तेव्हां या शोषकामुळेच तो पाण्यातील खडकाला धरुन राहू शकतो. ते त्यांच्या मागच्या पायाच्या सहाय्याने माती खणतात. एकदा का जमिनीखाली गेले की त्याच्या टोकदार डोक्याच्या सहाय्याने मातीत मुसंडी मारुन आपलं भक्ष्य पकडायला सुरुवात करतात. स्थित्यंतर पूर्ण होण्याआधीच ते जमिनीखाली जातात.

आई: हाच मुख्य फरक आहे नाही, नेहमीच्या बेडकांच्या तुलनेत?

महेश: हो ना सर्वसाधारणपणे बेडकांचे टॅडपोल पाण्यामध्ये मोकळेपणी संचार करतात, पोहतात. पण हे मात्र पूर्ण काळ खडकाच्या खालच्या भागांना शोषकाच्या सहाय्याने चिकटून रहातात.

आई: या बेडकाचं अंग सुजल्यासारखं दिसतं, नाही?

महेश: हो ना! सुजल अंग, गोलाकार शरीर, समोरच्या बाजूला छोटासा नावासारखा भाग काही वेगळंच रुप आहे त्याचं? त्याचे मागचे पाय मजबुत असतात. तसा आकाराने लहानच असतो. ७ से.मी. लांबी.

आई: या प्रजातीचा हा एकमेव बेडूक आहे का?

महेश: या प्रजातीचा पण वेगळया जातीचा बेडूक आहे– नेसिका बॅट्राशियस भूपथी

आई: भूपथी... शास्त्रज्ञाचं नाव आहे की का?

महेश: तुझा अंदाज ३०० टक्के बरोबर. डॉ.सुब्रमणियम भूपती जीवशास्त्रज्ञ होते. उभयचर आणि सरपटणाऱ्या प्राण्यांचे अभ्यासक होते. 'अगस्त्य माला' टेकडीजवळ 'फील्ड वर्क' करताना त्यांचा अपघाती मृत्यू झाला.

आई: अरेरे! या बेडकाची काय वैशिष्ट्यं?

आई: पण या जांभळया बेडकाला अचानक का महत्व प्राप्त झालं?

महेश: आफ्रिकेच्या जवळ असलेल्या सेशल्स या देशात जे बेडूक आढळतात, त्यांच्यात आणि या दोन जातींमध्ये साधर्म्य आहे.

आई: आश्चर्यच आहे! आफ्रिका कुठे आणि आपला देश कुठे?

महेश: तुझं म्हणणं अगदी बरोबर आहे. करोडो वर्षापूर्वी पैन्जीया नावाचा महाखंड होता. याचे कालांतराने वेगवेगळे खंड झाले. गोंडवानालँड या जुन्या खंडा आशिया आणि आफ्रिका हे एकत्र होते.

आई: महेश... म्हणजे तुला असं म्हणायचं आहे का... की हे बेडूक तेव्हांपासून अस्तित्वात आहेत?

महेश: नेमकं बोट ठेवलंस बघ! शास्त्रज्ञांचं असं म्हणणं आहे की ७-१० करोडो वर्षापूर्वी जेव्हा डायनासोरस आजिबात होते, तेव्हां हे बेडूक ही अस्तित्वात होते.

आई: म्हणजे पृथ्वीवर घडामोडी झाल्या, त्यातही हे

बेडूक स्वत:ला वाचवू शकते.

महेश: हो... नेमकं हेच शास्त्रज्ञांना वाटतं. म्हणून तर या बेडकांना 'जिवंत जीवाश्म' संबोधले जातं

आई: याचा अर्थ हा जांभळा बेडूक खूपच महत्वाचा आहे. त्याचा अजुन अभ्यास व्हायला हवा. त्यांचं संवर्धन करायला हवं.

महेश: नेमकं इथेच तर दुर्दैव आहे. इडुक्की जिल्ह्यात जिथे हे बेडूक सापडतात तेथील आदिवासी या बेडकाचे टॅडपोल, तसेच काही जणं या बेडकांचं भक्षण करतात.

(आकृती क्र.४ पहा)



आकृती क्र.४: आदिवासींचं खाद्य

आई: टॅडपोलच खाल्ले तर नक्कीच बेडकांची संख्या कमी होईल. महेश, एक विचारायचं राहिलं. हे बेडूक जमिनीखाली काय खातात? आणि साधारण किती खोलवर जातात?

महेश: या बेडकांचे जे अभ्यासक आहेत ना, त्यांना जमिनीखाली दीड मीटर खोलीवर हे बेडूक सापडले. पण त्यांना अजुन नीटशी कल्पना नाही की जमिनीखालच्या वास्तव्यात त्यांचं जीवन कसं असतं. पावसाला सुरुवात व्हायच्या आधी नेमके कसे ते वर येतात? त्यांना कसं कळतं?

आई: खरंच, आश्चर्य आहे!

महेश: या बेडकाचं मुख्य अन्न म्हणजे मुंग्या आणि वाळव्या.

आई : महेश, आजपर्यंत हिरवे, पोपटी, तपकिरी आणि अगदी पिवळया लाल बेडकांविषयी माहिती होती. पण जांभळया बेडकाविषयी चांगलीच माहिती सांगितलीस तू. छान!

महेश: थँक यू, आई! तूच तर मला शिकवलंस, कशी माहिती गोळा करायची ते... आता मी टिपणं काढतो, हं!

आई: हो, चल. मी पण माझ्या कामाला लागते.




जीवनासाठी विज्ञान...

# अंतराळातलं तंत्रज्ञान पृथ्वीवर

मेघश्री दळवी
मुंबई
email-meghashri@gmail.com

अंतराळवीरांना सोयीचा पडावा म्हणून नासाने आपला आकार राखून ठेवणारा मेमरी फोम विकसित केला. तो आज खुर्च्यांची कुशन्स,गाद्या, उशांमध्ये सर्रास दिसून येतो. छोटा डस्टबस्टर व्हॅकयूम क्लीनर आपण आज गाड्या किंवा ऑफिसमध्ये सहज वापरतो. ती कल्पना मुळात निघाली होती ती चांद्रमोहिमांसाठी. चंद्रावरचे नमुने मिळवण्यासाठी म्हणून नासाने पोर्टेबल ड्रिल तयार केले होते. त्यामागचं तंत्रज्ञान घेऊन डस्टबस्टरची निर्मिती झाली.



नासा ही अमेरिकन अंतराळ संशोधन संस्था सुरू झाली ती अंतराळ प्रवास आणि संबंधित संशोधन करण्यासाठी. गंमत म्हणजे यातलं बरंच संशोधन आपण आज चक्क पृथ्वीवर वापरत आहोत! नासाच्या तंत्रज्ञानाची अशी सुमारे दोन हजार पेटंट्स खाजगी कंपन्या नासाकडून विकत घेऊन अनेकविध उत्पादनांमध्ये वापरतात.

रॉकेट आणि स्पेस शटलमध्ये वापरल्या जाणाऱ्या स्क्रूला नासाने स्पायरलॉक रचना वापरून दुप्पट ताण सहन करण्याची क्षमता दिली. पुढे २०१३ मध्ये याचा वापर गोल्फ क्लबमध्ये करण्यात आला. गुरुत्वाकर्षणमध्य अगदी अचूक असल्याने या क्लबने मारलेला फटका पूर्ण शक्तीने लागतो. साहजिकच या क्लब्जना आता भरपूर मागणी असते.

अंतराळप्रवाशांच्या स्पेससूटच्या आत तापमान कायम राखण्यासाठी एका विशिष्ट प्रकारच्या धाग्याचा वापर होतो. नासाचं हे तंत्रज्ञान मग दुसऱ्या एका कंपनीने घेऊन लहान मुलांकरता खास

ब्लँकेट,पायजमा, खेळाडूंचे कपडे अशा ठिकाणी वापरलं आहे.

अंतराळप्रवास म्हटलं की प्रवाशांच्या खाण्याची सोय करणं हे मोठं आव्हान असतं. सुरुवातीच्या अंतराळ सफरीत यानात फक्त उपकरणं होती. पण माणसांना घेऊन उड्डाण करायच्या योजना सुरू झाल्या, तेव्हा ही बाब प्रकर्षाने पुढे आली. दुसऱ्या महायुद्धात सैन्याच्या रसदीसाठी फ्रीज ड्रायिंग तंत्रज्ञान वापरायला सुरुवात झाली होती. ताज्या अन्नावर जोरात थंडगार झोत सोडून ते तात्काळ गोठवायचं आणि लगेच निर्वात पिशवीत पॅकबंद करायचं हे तंत्रज्ञान नेसले कंपनीने चांगल्या प्रकारे विकसित केलं होतं.

नासाने ते उचललं आणि अंतराळप्रवासासाठी म्हणून त्यात आणखी संशोधन करून ते पूर्णत्वाला नेलं. याच तंत्रज्ञानामुळे आज आपण पोहे-उपमा यांच्या कोरड्या मिक्समध्ये गरम पाणी घालून ते लगेच खाऊ शकतो. आणि याच पद्धतीने तयार केलेली अन्नाची पाकीटं युद्धक्षेत्रात किंवा दुर्घटनाग्रस्त भागात पुरवली जातात.

अंतराळात प्रवाशांचं आरोग्य हा एक महत्वाचा प्रश्न असतो. त्यासाठी नासाने प्रचंड संशोधन केलेलं आहे, आणि अजूनही ते सतत सुरू असतं. आपल्या शरीराचं तापमान मोजण्यासाठी आपण थर्मोमीटर वापरतो. त्याचा शरीराला स्पर्श व्हावा लागतो. पण अंतराळयानात तो असा वापरला तर संसर्ग होण्याची शक्यता असते. हे टाळण्यासाठी काय करावं याचा विचार सुरू झाला. त्यातून पुढे आली अवरक्त म्हणजे इन्फ्रारेड किरणांचा वापर करण्याची कल्पना.

आपल्या कानातील उष्णता असे इन्फ्रारेड थर्मोमीटर दुरूनच मोजू शकतात. हे संशोधन खूपच उपयुक्त ठरल्याने त्याचा वापर नवजात बालकांसाठी करायला सुरुवात झाली. विशेषत: अतिदक्षता विभागातल्या बाळांच्या नाजूक स्थितीत इन्फ्रारेड थर्मोमीटरमुळे संसर्गाचा धोका टाळला जातो. करोना काळात अशा कॉनटॅक्टलेस थर्मोमीटरचा केवढा फायदा झाला हे वेगळं सांगायला नको. दुरून तापमान मोजण्याचं हे तंत्रज्ञान उद्योगधंदयामध्ये रिमोट हीट सेन्सिंगकरता वापरलं जातं.

आरोग्याशी संबंधित आणखी एक नासाचं संशोधन म्हणजे हृदयासाठी वापरला जाणारा छोटा व्हेन्ट्रीक्युलर पंप. केवळ अडीच सेमी रुंदीचा हा पंप खास अंतराळवीरांसाठी म्हणून नासाने डॉ मायकेल डीबेकी यांच्या मदतीने तयार केला. हृदयाचा अतिशय गंभीर आजार असणाऱ्या रुग्णांसाठी आज या पंपचा वापर महत्वाचा ठरत आहे. विशेषत: हृदय प्रत्यारोपणासाठी वाट बघणाऱ्या रुग्णांना नासाचा हा पंप वरदान ठरला आहे.

अंतराळवीरांना सोयीचा पडावा म्हणून नासाने आपला आकार राखून ठेवणारा मेमरी फोम विकसित केला. तो आज खुर्च्यांची कुशन्स,गाद्या, उशांमध्ये सर्रास दिसून येतो. छोटा डस्टबस्टर व्हॅकयूम क्लीनर आपण आज गाड्या किंवा ऑफिसमध्ये सहज वापरतो. ती कल्पना मुळात निघाली होती ती चांद्रमोहिमांसाठी. चंद्रावरचे नमुने मिळवण्यासाठी म्हणून नासाने पोर्टेबल ड्रिल तयार केले होते. त्यामागचं तंत्रज्ञान घेऊन डस्टबस्टरची निर्मिती झाली.

मेंदूच्या शस्त्रक्रियेमध्ये वापरले जाणारे बायपोलर चिमटे,मॅग्नेटिक फ्लूईड स्पीकर,वायरलेस हेडफोन्स, ओरखडे उमटणार नाहीत अशा चष्म्याच्या काचा, कानातले इंप्लांट्स,मोबाईलमधले चिमुकले कॅमेरे,अगदी आज जोरात असलेल्या क्लाऊड कम्प्यूटिंगचा उगमदेखील थेट नासाच्या संशोधनापर्यंत जातो.

अंतराळ संशोधनाचा वापर असा पृथ्वीवर आपण

सण उत्सव...

# दिपोत्सव



**पोपट शिवाजी निकम**
मिरज जि.सांगली
८८५७९३१०४८

हिंदू महिना अश्विन महिन्याच्या शेवटी म्हणजेच ऑक्टोबर किंवा नोव्हेंबर मध्ये हा दिवाळी सण येतो. सर्वधर्मीय लोक हा सण मोठ्या उत्साहात साजरा करतात. हा सण दीपोत्सव म्हणूनही ओळखला जातो. उल्हास, रांगोळीचे देखणं सौंदर्य, मैत्रीचा नवीन धागा,फटाक्यांची रोषणाई,दिव्यांची नवलाई अशा अनेक गोष्टींनी हा सण भारतीय संस्कृतीत प्रसिद्ध आहे.पारंपारिक रिती पद्धतीने आणि तज्ञांच्या मते या मुहूर्तावर नवीन वस्तू व सोने खरेदी करणे शुभ मानतात. त्यामुळे लोक सोने -चांदी खरेदी करतात.दिवाळी साजरी करण्यात कोणतेही कारण असो बाजारात या सणादरम्यान फारच उत्साहाचे वातावरण असते.

भारतीय संस्कृती अनेक गोष्टींनी नावारूपाला आलेली आहे.तसेच अनेक विविधांगी गोष्टीमुळे ही अख्या जगात प्रसिद्ध झालेली आहे.याचाच एक भाग भारतीय संस्कृतीमध्ये भारतामध्ये साजऱ्या करण्यात येणाऱ्या सणांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. भारतामध्ये वेगवेगळ्या प्रांतात अनेक बहुभाषिक लोक आनंदाने, एक दिलाने, गुण्यागोविंदाने नांदत आहेत. भारतातील वेगवेगळ्या राज्यात वेगवेगळे सण मोठ्या उत्साहानत साजरे केले जातात. यामध्ये बैलपोळा, वैशाखी, राखी पौर्णिमा, गुढीपाडवा, पोंगल,ओणम असे अनेक सण आपापल्याल्या राज्यात भारतीय लोक साजरे करतात.पण या सणाहुनही वेगळे वैशिष्ट्य असणारा दिवाळी हा सण फक्त भारतातील एका राज्यात साजरा न होता पूर्ण भारतामध्ये मोठ्या धामधुमीमध्ये अगदी लहानापासून मोठ्यापर्यंत सर्वजण आनंदात हा सण साजरा करतात.फक्त भारतातच नव्हे तर अख्या जगात विखुरलेल्या भारतवंशीय लोक हा दिवाळी सण दीपोत्सव म्हणून मोठ्या उत्साहात, धुमधडाक्यात साजरा करत असल्याचे आपणास दिसून येते.

दरवर्षी लोक मिठाई,कपडे आणि जरुरी वस्तू तसेच आभूषणाच्या दुकानावर मोठी गर्दी खरेदीसाठी करतात. सामान्यात सामान्य माणूसही मनमोकळेपणाने या सणानिमित्त विविध वस्तू खरेदी करून हा सण मोठ्या उत्साहात साजरा करतात. या सणाचे आगळेवेगळे वैशिष्ट्य म्हणजेच हा सण पाच वेगवेगळ्या घटकानुसार आपापल्या चालीरीती नुसार सारे भारतीय लोक परदेश वसलेले लोक सुद्धा साजरा करताना दिसतात.

**दिपावलीचे पाच दिवस:-**

साऱ्या भारतभर दिवाळीचा पाच दिवस चालणारा हा उत्सव फारच मनोरंजक असतो.घर दुकान फुलांनी आंब्याच्या पानांच्या तोरणांनी सजवले जाते. घरावरती आकाश कंदील लावून, घरासमोर सुंदर रांगोळी काढून असे हे उत्साहाचे वातावरण द्विगुणित करणारा हा सण दिपोत्सव.

**दिवाळीच्या पाच दिवसांचे वर्णन:-**

**(१)धनत्रयोदशी:-**

खरंच दिवाळीची सुरुवात या धनत्रयोदशीने होते.या दिवशी नवीन वस्तू,सोने,कपडे,खरेदी करणे शुभ मानतात.धनाची देवी धन्वंतरीची पूजा करून,अभिषेक घातला जातो.असे म्हटले जाते की या दिवशी देवी धन्वंतरीचा जन्मदिवस पण असतो.

**(२)नरकचतुर्दशी:-**

नरकचतुर्दशीचा दुसरा दिवस छोटी दिवाळी म्हणून साजरा करतात.या दिवशी लोक घराची सजावट करतात.महिला हातावर मेंदी काढतात्दिवाळीच्या संपूर्ण तयारीचा आढावा या दिवशी घेतला जातो.

**(३)दीपावली लक्ष्मीपूजन:-**

सर्वात महत्त्वाचा आणि ज्याला आपण दिवाळी म्हणतो तो हाच दिवस लक्ष्मीपूजन.या दिवशी मोठ्या थाटामाटात योग्य चालीरीती रिवाजात माता लक्ष्मी, श्री गणेश भगवान,आणि माता सरस्वतीची घरामंध्ये मनोभावे पूजा केली जाते.घराची सर्व दारे- खिडक्या उघडी ठेवून या देवी-देवतांना आमंत्रित केलं जातं. घरातील पैसे,नाणी या लक्ष्मीमाते पुढे ठेवून पूजा केली जाते.गोड मिठाई वाटून,फटाके फोडून,एकमेकांना दिवाळीच्या मंगलमय शुभेच्छा देऊन ही दिवाळी अर्थातच लक्ष्मीपूजनाचा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो.

**(४)पाडवा:-**

दिवाळीचा चौथा दिवस पाडवा.या दिवशी बरेच लोक भगवान श्रीकृष्णाची गोवर्धन पूजा करतात.ग्रामीण भागात घरातील पशूंना दिवाळीचे मिष्ठान्न खायला देतात.घरातील मोठी वाहने स्वच्छ धुऊन या वाहनांना नारळाचे गज बांधून, हारतुरे घालून मोठ्या थाटामाटात पूजा केली जाते.

**(५) भाऊबीज:-**

भाऊ-बहिणीच्या अतुट आणि असीम प्रेमाचं नातं जोपासण्याचा हा दिवाळीतील पाचवा अर्थातच शेवटचा दिवस. या दिवशी बहीण आपल्या भावाला ताटामध्ये दिव्यांची आरास आणि मोठ्या आत्मीयतेने ओवाळून आपल्या भावाला समृद्धी व भरभराटीची त्याच्या सुखी जीवनासाठी शुभकामना देते.भाऊ बहिणीला छानसे उपहार देऊन खुश करतो. आपल्या बहीण-भावाच्या नात्याला अधिक मधुर बनवण्याचा प्रयत्न करतो.हा दिवस भाऊ-बहीण सोबत राहून साजरा करतात.या दिवशी विवाहित बहिणी माहेरी येत असतात.हा भाऊबीज रक्षाबंधन इतकाच पवित्र मानला जातो.

आपल्या भारत देशात विविध जाती-धर्माचे लोक एकमेकांचे सण मोठ्या उत्साहात,आनंदात साजरे करतात.यासणा दिवशी एकमेकांना शुभकामना देऊन उपहार व दिवाळीचे मिष्ठान्न देऊन आपलं माणुसकीचा नातं अधिक बळकट करतात.

सन २०२० ची दिवाळी थोडीशी वेगळी म्हणावी लागेल. कारण या जगावर तसेच भारत

देशावर या जागतिक covid-१९ च्या महामारीमुळे मोठा विपरीत परीणाम झाल्याचे दिसून येते. न भुतो न भविष्यती असे दुष्परिणाम साऱ्या मानव जातीवर या covid-१९ च्या प्रादुर्भावामुळे झाले आहेत. आजही हा कोरोना रोग पूर्ण बरा झाल्याचे दिसत नाही.तेंव्हा या रोगाचा सामना करण्यासाठी येणारी ही दिवाळी आपण सर्वजण साधेपणाने आणि वायफळ खर्च न करता साजरी करूया.तसेच ही येणारी दिवाळी शासनाने घालून दिलेल्या नियमांचे पालन करून साजरी करू.प्रदूषण मुक्त साजरी करण्याचा संकल्प आपण सर्वजण करू. फटाक्यांना फाटा देऊन आपला परिसर स्वच्छ ठेवूया, सुंदर ठेवूया.दीप प्रज्वलन करून हा सण साजरा करू.आपलं घर, आपलं गाव स्वच्छ व सुंदर ठेवूया.ही प्रत्येक भारतीयांची जबाबदारी अर्थातच कर्तव्य समजूनच आपण ही जबाबदारी पार पाडूया.एक दिवाळी अर्थातच दिपोत्सव सर्वांनी साजरा करूया.

# लॉक डाऊन ची शाळा...

शाळा बंद शिक्षण. ?



श्याम सायस गायकवाड
पन्हाळा-कोल्हापूर
९७६७३००२०६

गुड मॉर्निंग बाळा. काय अडचण आहे का? सर्व ठीक आहे ना? हो सर, सर्व ठीक आहे. रागवाल नसाल तर एक विचारू का? विचार ना बाळा त्यात रागवाया सारख काय आहे. मी थोडा विचार केला आणि सरांना म्हणालो, सर,शाळा कधी सुरु होणार आहे? ते थोडे हसले आणि म्हणाले, का रे?

आमच्या शाळेचा वार्षिक स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम नुकताच संपला होता.महिनाभराच्या अथक परिश्रमानंतर आम्ही सर्व मुलही थोड रिलॅक्स झालो होतो.सांस्कृतिक कार्यक्रम म्हटलं की आम्हा मुलांसाठी एक पर्वणी आणि मौजच असते. आमच्यातील एका उत्तम कलाकाराला स्वत:शीच भेटणं आणि त्याची शिदोरी उर्वरित आयुष्यासाठी बांधून ठेवणंच जणू काही. त्यातूनच उत्तम नट-नटी, कवी- कवियत्री ,कलाकार आणि उत्तम नेतृत्व ही जन्मला येत असत.'जसेबाळाचे पाय पाळण्यात दिसतात' तसच विद्यार्थ्यांची बहुरंगी बहुढंगी आयाम यातूनच तर फुलतात हे नेहमी सर आम्हाला सांगायचे .कार्यक्रम झाल्यावर एक दिवसाची सुट्टी जाहीर केली होती.थोडा विसावा आणि आलेला क्षीण घालवण्यासाठी.

सुट्टी संपली तशी नव्या जोमाने आणि नजरेत नवी दिशा नवी उमेद घेऊन आम्ही मुलं हसत मुखाने शाळेत दाखल झालो. त्याला कारणही तसंच होतं आमचा आवडता हाफ डे सुरु होणार होता. सकाळी शाळेत यायच मन लावून शिकायच आणि दुपारी काय धमाल करायची अशा बेताची आखणी चालली करण्यात दंग झालो होतो. शाळेतील वातावरणात नवचैतन्य संचारलं होत पण नियतिला काही औरच मंजूर होतं. ती जणूकाही वेगळच सांगण्याचा प्रयत्न करीत होती आम्हाला नाही सर्वांनाच बजावत होती बाबानो थोड सबुरीने घ्या. पण तिच ऐकणार कोण? आम्ही आमच्याच धुंदीत.

तेवढ्यात अचानक वीज चमकावी तशी बातमी आली ती म्हणजे शाळेला सुट्टी तीन चार दिवस सुट्टी मिळणार होती.सरांना आम्ही पुन्हा पुन्हा त्याविषयी विचारणा करत होतो. काय तर म्हणे कोणता तरी नवीन रोग आलाय -कोरोना नावाचा. त्याला संपवण्यासाठी रोखण्यासाठी उपाय म्हणून जनता कर्फ्यू लागणार आहे त्याची खबरदारी म्हणून मुलांना काही दिवसांची सुट्टी जाहीर झाली होती.

आम्ही मात्र खुशीत होतो. पुन्हा सुट्टीच प्लॅनिग सुरू

होणार होत. जसा जनता कर्फ्यू संपला तसाच क्षणार्धात लॉकडाऊन ची सुरुवात झाली होती . लॉकडाऊन, सोशल डिस्टंशींग, क्वारंनटाईन या संकल्पनाच नवीन होत्या.

संपूर्ण देश लॉकडाऊन झाला होता तस आम्हीही झालो पण

खेडेगावात असल्यामुळे थोडी नियमात शिथिलता होती. आम्ही बाहेर पडू शकत होतो खेळू शकत होतो.

अगदी सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत फक्त आणि फक्त खेळ सुरू झाला होता.सकाळी सुरुवात झाली की संध्याकाळ होईपर्यंत खेळ खेळत होतो.दिवसभर खेळायला मिळत असल्याने मजा वाटायला लागली होती . दिवसामागून दिवस जायला लागले तस अधून मधून अभ्यासाकडे वळायचो पण काय थोडीच सर येणार आहेत तपासायला? असा विचार यायचा आणि मग झाला की अभ्यास करणं बंद. अधून मधून आईचे बाबांचे धपाटे मिळायचे पण लाडही तितकेच व्हायचे.

थोड्या दिवसानंतर ऑनलाईन शिक्षण सुरू झालं होतं .ऑनलाईन गेम ,गोष्टी, गाणी हेच ऐकल होत पण ऑनलाईन शिक्षण काही तरी भन्नाट वाटलं.चलो कुछ तो तुफानी करते है। असच वाटायला लागलं. नव म्हटलं की त्याची जबरदस्त क्रेझ असते तसंच झाल.

आमच्या सरांनी वर्गातील सर्व मुलांचा वॉट्सअप ग्रुप तयार केला होता . दररोज नवनवीन अभ्यास यायला लागला तस आम्ही सर्व मुल ऑनलाईन अभ्यासावर तुटुन पडलो. काहीतरी नवीन शिकायला मिळतय यामुळे आम्ही भारावलेले होतो. मनापासून तळमळीने आम्ही सर्वजण अभ्यास करायचो. सुरुवातीला मोबाईल, नेटवर्क अशा अनेक समस्या निर्माण झाल्या ख-या पण त्यावर सर्वांनी मिळून मात करायच ठरलं. आम्ही सगळे तयार झालो. ज्यांच्याकडे ॲन्ड्रॉईड मोबाईल नाही त्यांनी दुसऱ्यांच्या घरी जाऊन अभ्यास करावा हे सरांनी पुन्हा पुन्हा सांगितले होते आणि आम्ही तशी तयारीही केली होती मग काय ? झाला आमचा अभ्यास सुरु. खुप मज्जा यायची.आम्ही आता ऑनलाईन शिक्षणात रममान झालो होतो.ते शिक्षण हवहवस वाटायला लागलं होतं. सर जवळ नसल्यामुळे ते रागवणार नाहीत ही भावना खुपच सुखावणारी होती.ज्या मुलांकडे मोबाईल नव्हते त्या मुलांनी रडून हट्ट धरून नवीन मोबाईल घ्यायला लावले. नवा मोबाईल आणि नवी शिक्षणाची पद्धत खुपच अनोख वाटायला लागल. पालकांनी आमच्या भविष्यासाठी म्हणा अथवा हट्टापायी नवाकोरा मोबाईल घेवून दिला तशी आमची शिक्षणाची गाडी सुसाट धावायला लागली.

आनंदाने शिक्षण सुरु झालं.मोबाईलवर अभ्यास करायचा याच सगळ्यांना भारी कौतुक विशेष म्हणजे आजी आजोबांना तर नवलच वाटायच .अधूनमधून व्हॉट अन आयडिया सरजी या जाहिराती विषयी आजोबा आम्हाला सांगायचे. खुप वर्षांपुर्वी अशी जाहिरात येत होती असे ते सांगायचे. सरांनाही या नवीन शिक्षण पद्धतीच नवल वाटायच. अधून मधून ते त्यांचा लहानपणीचे किस्से सांगायचे.त्यांनी आम्हाला ऑनलाईन शिकण्यासाठी ऑनलाईन कस यायच ?ग्रुप जॉईन कसा करायचा? व्हिडिओ आणि ऑडिओ चालू बंद कसा करायचा याविषयीची माहिती सांगायचे. सुरुवातीला आम्हाला काही जमायच नाही पण हळूहळू आम्ही ते आत्मसात केलं. चार भिंती सोडुन फळा,खडू नी डश्टर आणि महत्त्वाचे म्हणजे मुलाशिवाय शिक्षण अजबच प्रकार वाटायचा ? सर वेळोवेळी सुचना देऊन आमचा अभ्यास काटेकोरपणे घ्यायचे. डार्विन सांगतो, जो संघर्ष ,धडपड करणार नाही आणि नव ज्ञान आत्मसात करणार नाही तो जगण्यास सक्षम असणार नाही असं सर आम्हाला

म्हणायचे .कळायच तर काही नाही पण भारी वाटायचं.

आमचे सर दररोज निरनिराळा अभ्यास न चुकता पाठवायचे. यू ट्यूब वरील अभ्यासाच्या लिंक , सरांनी तयार केलेला अभ्यास ,घटकावरील ऑनलाईन चाचण्या व रंगीबेरंगी चित्रासहित आलेला अभ्यास तो करताना मन प्रसन्न आणि हरपून जायच.

गुगल मीट द्वारे सर दररोज तास घ्यायचे .सुरूवातीला कळायचं नाही पण सरावाने तेही जमायला लागल. खरं सांगायच तर आम्ही मोबाईल हातात घेऊन दिलेल्या वेळेच्या आधीच तयार होऊन बसलेलो असायचो.

महिनेवर महिने निघून जात होती तशी तशी परिस्थितीही कुस बदलत होती. ज्या प्रकारे नव्या शिक्षणाच स्वागत केलं होतं हळूहळू काही तरी निसटल्यासारख अपुरं असल्यासारखं भासायला सुरूवात झाली होती. 'सम थिंग इज मिसिंग'असच हळूहळू वाटायला लागलं होतं .शिक्षक समोर आहेत पण ते असल्याची जाणीव होईनाशी झाली होती. ते जीव तोडून शिकवत आहेत पण शिकण्याला पूर्णत्व नसल्यासारख वाटायला लागलं होतं. अभ्यास करतोय पण केल्यासारखं वाटेनासं झाल होत. मित्रांना पाहू शकतोय बोलू शकतोय पण एका बाकावर बसल्याचा आनंद अनुभवता येत नाही याची खंत वाटायची.हे आठवल की मग मन खट्टू होऊन जायचं.

लॉकडाऊन असल्यामुळे घरात बसून सर्व प्रकारचे खेळ खेळून झाले होते. पण आता शाळा हवीहवीशी वाटायला लागली होती. आम्ही खुप मिस करतोय आमच्या शाळेला अशी पक्की भावना निर्माण झाली होती . एकदाची कधी सुरू होईल माझी शाळा ? कधी मित्रांना कडकडून मिठी मारेल ?अशा असंख्य प्रश्नांच काहूर माजलं होत.

मनाशी पक्कं ठरवलं काही झालं तरी सरांना फोनवर विचारायच ? थरथरत्या हातांनी फोन हातात घेतला. सरांचा नंबर डायल केला आणि काय कसं बोलायचं याचा विचार करायला लागलो तिकडून 'हॅलो हॅलो' असा आवाज ऐकू आला तसा मी भानावर आलो. 'गुड मॉर्निंग सर'

अशा बिकट परिस्थितीत तुला का हवी आहे शाळा ? मी मन घट्ट करून बोलायला लागलो, सर, मला माझ्या शाळेचा परिसर, माझा वर्ग आणि माझा आवडता समोरचा बाक मला पुन्हा अनुभवायचा आहे... शाळेत आज मी पहिल्या नंबरला आलोय हे सांगायच आहे तुम्हाला...झोपाळ्यावर बसून झोके घ्यायचे आहेत... सफाई करताना हळूच तुम्ही पाहताय का नाही याची खात्री करायची आहे... सर हा सफाई करत नाही हे न चुकता सांगायच आहे... दुपारच्या जेवणाच्या वेळेस मुलांची रांग मोडून पहिल्या नंबरवर जेवण घ्यायच आहे सर... शाळेची घंटा वाजवायला मिळावी म्हणून तिच्या भोवती चकरा मारायच्या आहेत मला... तेवढ्यात माझ्या मनाचा ठाव घेवून वाजव रे घंटा! म्हणताना तुमच्या चेहऱ्यावरील ते स्मित पहायचे आहे...घंटेचा तो टणटण आवाज कान तृप्त होईपर्यंत ऐकायचा आहे ...

परिपाठाच्या रांगेत उभं असताना मागचा कसा ढकलतोय हे सांगायचे आहे सर...परिपाठाला रांगेत बसून मौन सुरू असताना हळूच अर्धा डोळा उघडून आपल्याकड कोण पाहत तर नाही ना याची खात्री करायची आहे... वर्गात येताच आनंदाने हसतमुखाने 'गुड मॉर्निंग टिचर' बोलायच आहे. तितक्याच सहजतेने 'गुड मॉर्निंग ऑल ऑफ यू. प्लीज सीट डाऊन.पुन्हा एकदा ऐकायच आहे... सर थोड थांबा पेन्सिलच टोक काढतो आणि हळूच

पेन्सिलच टोक काढून कौतुकान वहीत दडवून ठेवायच आहे...

सर तास सुरू असताना नजर चुकवून हळूच चॉकलेट तोंडात टाकून सरांना काही कळलच नाही म्हणून आनंदी व्हायचं आहे... पुन्हा नव्या कोऱ्या पुस्तकाचा-वहीचा आनंद घ्यायचा आहे ... एखाद्याने लघवीला जाण्यासाठी बोट वर केल तर लघवी नसतानाही त्याच्यासोबत बाहेर फेरफटका मारायचा आहे...

इंद्रधनुष्य निघाल्यावर सर्वात आधी मी पाहीलं आहे हे सांगायच आहे सर... सरांनी शाब्बास म्हटल्यावर ऊर अभिमानाने भरून घ्यायचा आहे सर. सरांनी आज मला बक्षीस दिल हे पळत जावून आईबाबांना सांगायच आहे.

तुमच्या कौतुकाची थाप पाठीवर पुन्हा अनुभवाची आहे...नवी दिशा नव क्षितिज पादांकृत करायची आहेत... एका खोलीत गप्प बसून शिकायच नाही सर मला ...मला माझ्या मित्र मैत्रिणी सोबत शिकायचं आहे ... शाळेतल्या सर्व कार्यक्रमात सहभागी व्हायचे आहे मला... प्रभात फेरी काढताना मोठ्याने घोषणा द्यायच्या आहेत मला... खोखो कबड्डी क्रिकेट असे अनेक खेळ खेळायचे आहेत... .घरगुंडीवरुन मुलांसोबत घसरायच आहे... सिसॉ मेरी गो राऊंड वरती घिरट्या मारायच्या आहेत... शाळा सुटली की तुम्हाला बाय करायच आहे...आणि खूप काही...

माझ्या मनात इतके दिवस जे साठल होत ते मी न थांबता बोलत होतो. सर शांतपणे ऐकून घेत होते. आता माझं बोलून झालं होतं. क्षणभर आवाज अंधारात गुडूप व्हावा तसा झाला होता. थोड्या वेळाने सर बोलले, बाळा नक्कीच सुरु होईल हं आपली शाळा. लवकरच सुरु होईल. एवढं बोलून सरांनी फोन ठेवला होता. पण त्याच्या आवाजातील तो नवखेपणा मी चटकन हेरला होता.नेहमीसारखा तो आवाज नव्हता तर त्याच्या बोलण्यातील जडपणा मी ओळखला होता. त्यांनाही गहिवरून आलं होतं हे न पाहताही मी खात्रीने सांगू शकत होतो. त्यांचा हात आपल्या डोळ्यांकडे गेला असेल हे मला वेगळं सांगायची गरज उरली नव्हती. सरांनाही माझ्यासारखी शाळेची आस लागली होती हे नक्की झालं होतं . मी ही इकडे आपले पाणावलेले डोळे पुसले खरे पण आता फक्त एकच प्रश्न उरला होता तो म्हणजे खरच आमची शाळा सुरू होईल की ही लॉकडाऊनची शाळा अशीच सुरू राहील ?

## काळजी

माझी कविता..

*कशी कोठून ही येते*
*कधी वेळी अवेळीच*
*चोर पावलांनीजाते*
*कुर्तडून ही काळीज।।धृ।।*
*कसे हिला अडवावे*
*नाही कळते वेळीच*
*कसे कोणत्या धाग्यांनी*
*शिवायचे हे काळीज।।१।।*
*माझे मलाही न कधी*
*कसे काही कळलेच*
*मन पाचोळ्याच्या परी*
*केंव्हा कुठे गळलेच।।२।।*
*कळेनाच माझे मला*
*केंव्हा कशी वाळलीच*
*काय कसली काळजी*
*कुणी म्हणे लागलीच ।।३।।*
*आधी तोडून लचके*
*मन करते काबिज*
*मनासवे देह सारा*
*सदा जाळणारी हिच।।४।।*
*सुखा समाधानाची ही*
*काळ बनतेही हिच*
*कुणी म्हणे चिंता कुणी*
*म्हणे काळजी ती हिच।।५।।*

**मंगला मधुकर रोकडे.**
**९३७१९०२३०३.**

# शिक्षण सुरूच आहे!

शाळा बंद शिक्षण?



**पालिकचंद बिसेन**
लाखनी-भंडारा
९४२१७१६१२८

**चीनच्या खाद्यसंस्कृतीची जिथेतिथे चर्चा आहे. आमची मुलं सारं ऐकत आहेत. त्यांचं अनौपचारिक शिक्षण चालूच आहे.तसं पाहिलं तर रचनावादी सिद्धांतानूसार मूल स्वतःच शिकत आहे .तो शाळेशिवाय जीवन अनुभवत आहे. निसर्गाच्या विविध छटा टिपत आहे. प्रत्येक वस्तूच्या भौतिक अस्तित्वामागचे सारे अदृश्य नियम अनुभवत आहे. गरज आहे फक्त त्याच्या समुपदेशनाची ,प्रमाण भाषेतून ते व्यक्त होण्याची बस्स!!म्हणूनच पुन्हा म्हणावसं वाटतं , शाळा सुरुच आहे. शिक्षणही सुरुच आहे!!**

शिक्षण म्हणजे क्षणाक्षणाला शिकणं.शिक्षण म्हणजे पुर्णत्वाचा आविष्कार.शिक्षण म्हणजे शरीराचा, मेंदूचा आणि हृदयाचा विकास. अशा कितीतरी शिक्षणाच्या व्याख्या आपण आजवर ऐकल्या ,आणि ऐकतच आहोत. तरी काहीतरी हातून सुटतंय असंच वाटतं.एकंदर संपूर्ण व्यक्तीमत्वाचा सर्वांगीण विकास असाच अर्थ सर्वांना अभिप्रेत आहे.

शिक्षण नावाच्या या जादूच्या कांडीचे ढोबळमानाने दोन प्रकार पाडता येतात. एक औपचारिक आणि दुसरं अनौपचारिक शिक्षण

औपचारिक शिक्षणासाठी शाळा, कॉलेज, महाविद्यालये,विद्यापीठं तयार झाली. तसं बघितलं तर हे विश्व म्हणजे एक शाळाच आहे. हा निसर्ग म्हणजे एक उघडा ग्रंथच!.या विश्वरुपी ग्रंथाचा व्यवस्थित, पद्धतशीर अभ्यास करण्यासाठी शाळा, कॉलेजची निर्मिती करुन विषयवार विभागणी करण्यात आली. दोन हजार वीसला जगावर 'कोरोना' नावाची महामारी आली.तिचे चीन, स्पेन, इटली आणि अमेरिका या प्रगत देशावर भयंकर परिणाम झाले. हळूहळू भारतही कोरोनाग्रस्त देशांच्या यादीत जगात दुसऱ्या क्रमांकावर आला आहे. पुराणातील एक राक्षस 'कोरोना १९' हे नाव धारण करुन जणू आपलं साम्राज्य स्थापू पाहतो.आणि याचाच परिणाम म्हणून जगातील सर्वच देशातील शाळा कॉलेज बंद पडले.मुलांची शाळा बंद पडली.शाळा बंद म्हणजे शिक्षण बंद असा सर्वसामान्य समज आहे. बऱ्याचअंशी हे बरोबर वाटत असले तरी पुर्णतः बरोबर नाही. शिक्षण हे शाळेत जसे चालते तसे घरी, परिसरात ही चालत असते. अनौपचारिक शिक्षणा शिवाय औपचारिक शिक्षणाला पुर्णत्व येणार नाही.

ज्ञानरचनावादी तत्वात एक तत्व आहे की, ज्ञाननिर्मीतीत सामाजिक, भाषिक, सांस्कृतिक, स्थानिक परिस्थिती आणि परिसराचा मोठा वाटा असतो.मग ज्ञाननिर्मीती जर चालू असेल तर शिक्षण कुठे बंद म्हणता येतील?

एका अर्थानं शिक्षण सुरुच आहे.यात आमचे शिक्षक बांधवांचे काम खरोखरच प्रसंशनिय आहे. नवे तंत्रज्ञान ते झुम,गुगल मिट,जिओ मिट, गुगलक्लासरुमच्या ,युट्युबच्या माध्यमातून ग्रहन करुन ते विद्यार्थ्यांना सुलभ करुन सांगत आहेत.विद्यार्थीही अनेक अडचणींचा सामना करुन शेवटी शिकतच आहेत .मोबाइलला चालण्यासाठी न दिसणारी रेंज लागते ,ही रेंज काय भानगड आहे म्हणून ते अंतर्मुख होत आहेत. खेड्यातील सोयी आणि शहरातील सोयींची तुलना करत आहेत. धडपडत आहेत.शिक्षण म्हणजे शेवटी अडचणींवर मात करणेच नाही का?होय, असंच म्हणावे लागेल. आपल्या क्रांतिकारकांनी याहीपेक्षा भयानक स्थितीत राहून मिळालेल्या ब्रेकचा (सवडीचा)सदुपयोग केला.साने गुरुजींनी 'श्यामची आई' नाशिकच्या तुरुंगात लिहिली. मंडालेच्या तुरुंगात,'गीतारहस्य'टिळकांनी लिहीले. स्वा.सावरकरांनी अंदमानात भिंतीवर कमला काव्य कोरले. हे सारे तूप रोटी न खाता .दिवसभर कष्टाचे काम करून हे काम केलंय . यासाठी एडिसन, जार्ज कार्व्हर याचे चरित्रही चित्तवेधक ठरेल.शिक्षण हे असंही असतं.प्रत्येक स्थितीत, प्रत्येक परिस्थितीत मरेपर्यंत चालणारं! गुरुदेव रविद्रनाथ टागोरांच्या शाळेबाहेरच्या शाळेत आपण आज आहोत. मग शाळा तरी कुठे बंद आहे?

जागतिक महामारीनं माणसांना घरात ,गावातच कोंडुन घ्यायला भाग पाडलं. जग हे बंदीशाळा हा अनुभव माणूस घेत आहे. घरातील आजी-आजोबांशी बोलायला मुलांना वेळ मिळत आहे. त्यांच्या बोलीतील मधुरता,शब्दवैभव,वाक्यप्रचार,म्हणी, मुलं शिकत आहेत. आई-वडीलांशी गप्पागोष्टी करत आहेत.विसरलेल्या नात्यांशी विण विणत आहेत. आपलं घर, शेत, परिसर, नव्यानं वाचत आहेत. घरातील जुणी-पुराणी कपाटातील पुस्तकं चाळत आहेत. राहीलेला होमवर्क करत आहेत. घरातील शेळ्या,गाई,म्हशींची काळजी घेऊन सहजीवन शिकत आहेत.ज्या नैतिक आणि आध्यात्मिक मूल्यांनी भारत देश वैभवाच्या शिखरावर होता त्या मूल्यांना तो नव्याने समजत आहे. घर,अंगणातच लपाछपी, चेंडू, पाट्या ते पारंपरिक खेळ खेळत आहेत. आणि त्याचबरोबर भविष्यात कोरोना सारखे संकटे येणार म्हणून आमचे बालवैज्ञानिक सजगही होत आहेत.

घराघरात कोरोनाविषयी महाचर्चा होत आहे. भारतीय संस्कृतीकडे नव्या नजरेने बघत आहे.काही मूल्यांची उजळणी होत आहे.उदा:शाकाहार, नमस्कार पद्धत,वटवाघूळांना वेगळे मानणे इ.

जुन्यातील काही चांगलं आणि नवं विज्ञान याचा मेळ घातला जात आहे. शेवटी सर्वांचा मेळ घालणं म्हणजेच शिक्षणंच की नाही?.डोळ्यांना न दिसणाऱ्या एका अदृश्य विषाणूत असणाऱ्या शक्तीचा मानव वेध घेत आहे. सारी माणसे या राक्षसाला मारुन गोकुळरुपी विश्वाला वाचविण्यासाठी कृष्ण बनत आहे. हे सारं चालत आहे विणा दडपणात! मग शिक्षण कुठे बंद आहे?

बरं असो,या जागतिक महामारीने माणसाला अंतर्मुख व्हायला भाग पाडले आहे.या निमित्ताने सृष्टी माणसाला काहीतरी सांगु इच्छीत आहे.आपल्या विचार नियमांकडे आम्हाला आकृष्ट करत आहे.

जगा नि जगू द्या,साधे तत्त्व
माणसा तू रे,कसा विसरलास?
शाकाहारी प्रकृती तुझी
मांसाहारी वृत्तीत रमलास!!

दखल

# गांभीर्य



**टी.विद्यानंद**
पदवीधर अध्यापक जि.प.नाशिक
९४०४५८५८८६

नेमकं देश संकटात असताना आपण आपल्या चैनी विश्वातून बाहेर पडायचच नाही. कोणाचं नुकसान झालं तरी चालेल ही विचारसरणी घेऊन फिरत रहायचं म्हणजे अतिच होतय. याचा अतिरेक म्हणजे खरा अतिरेकी पणाच झाला.(पुन्हा तेच...!!) हे एक नागरिक म्हणून देशाप्रतीच्या आपल्या नैतिक व मूलभूत कर्तव्यांच्या विरूद्ध आणि राष्ट्रीय संकटात वाढ करणारच वर्तन आहे. कारण नागरिकशास्त्र कोणत्याच खरया नागरिकास असं कृत्य करण्याची कायदेशीर तर सोडाच पण नैतिकसुद्धा अनुमती कधीच देत नाही. त्यातही असं कृत्य करणारा खरोखरच देशाचा जबाबदार नागरिक आहे का? हे तपासून पहायचीच वेळ आता आलीय.

सध्या अति गंभीरतेच्या उंबरठ्यावर येऊन ठेपलेली कोरोनामय अशी ही करूणामय झालेली परिस्थिती येथपर्यंत आलीच कशी? याला जबाबदार कोण? कसे? का? या प्रश्नांची उत्तरे शोधत बसण्याची ही वेळ नाही. निश्चितच नाही. सामान्य कडून गंभीरतेकडे , गंभीरतेकडून अतिगंभीरतेकडे आणि आता मात्र अतिभीषणतेकडे वाटचाल करीत मोठ्या वेगाने व दिमाखाने अवघा सहाच महिन्यांचा हा एवढासा कोरोना एवढा दुडूदुडू कसा काय धावतोय? नेमका कोणता एनर्जी बुस्टर मिळाला त्याला? अन् तो कोठून मिळाला? तो एनर्जी बुस्टर कशाच्या अभावजन्यतेचा तर नाही ना? कारण याची अनेक कारणे आहेत. यात शंकाच नाही. परंतु ज्या काही सर्व कारणांमुळे ही परिस्थिती ओढावलीय.. तो आता चांगलाच धष्टपुष्ट झालाय.. अजूनही सुदृढतेचा बोनस मिळाल्यासारखा वाढतोच आहे.. त्या सर्व कारणांच मूळ मात्र एकाच कारणात दडून बसलेलं आहे. (यांबाबत कोणाच अन् कधीच दुमत असण्याचं काहीच कारण असू शकत नाही आणि ते नसावंच.) तर ते आपल्या सर्वांच्याच मूळावर ऊठलेलं मूळ कारण म्हणजे, लोकांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन व नागरिकशास्त्र या दोन विषयांचं असलेलं अपुरं / अर्धवट ज्ञान वा वैज्ञानिक दृष्टिकोनातून पार पाडावयाच्या नागरी कर्तव्यांच्या जाणीवेचा अभाव... कारण ज्यांना हे दोन विषय चांगले कळालेले आहेत ते लोक घरांतच आहेत. पण ज्यांना त्या विषयांची समजच आलेली नाही वा पुरेसे कळालेलेच नाहीत वा अर्धवटच कळाले आहेत. ते लोक मात्र काही ना काही कारणे शोधून (होय. शोधूनच. कारण हे लोक काहीच कारण नाही मिळालं तर विनाकारण तरी का होईना पण) घराच्या बाहेर भटकंतीवरच आहेत. हे मी ठामपणे सांगू शकतो. ज्यांना नागरिकशास्त्र चांगलं वा निदान पुरेसं तरी समजलेलं आहे ते स्वतःबरोबरच राष्ट्राप्रतीची त्यांची प्रेमाची वा राष्ट्रभक्तीची भावना, संयम, कर्तव्ये,

जबाबदारी, नैतिक भूमिका अशा विविध आघाड्यांवर केवळ स्वतःचा स्वार्थ किंवा फायदाच न पहाता सर्व नियम / मार्गदर्शक सूचना काटेकोरपणे पाळत आहेत. इतरांनाही विनंत्या- अर्जवे करून त्यांच्या परिने होईल तेवढं पाळायला सांगत आहेत. समजावत आहेत. त्याचबरोबर त्यांना विज्ञान ही काहीसं समजलेलं/ कळालेलं / जाणवलेलं असल्याने वा वैज्ञानिक दृष्टिकोन पुरेसा विकसित झालेलाच असल्याने ते अगदी खूपच अत्यावश्यक कामासाठीच घरातून बाहेर पडतायेत किंवा बाहेर पडायची वेळ आलीच तरी सर्व प्रकारची योग्य ती पुरेशी खबरदारी/ काळजी घेऊन व बचावात्मक उपायांसहच...!! त्यांच्यामुळे जवळपास धोका नसल्यातच जमा आहे. त्यांना शरीराच्या निरोगीपणा/ तंदुरूस्तीच महत्व कळालेलं आहे. उपनिषद सांगते....

।।शरीरमाद्यं खलु धर्मसाधम्।।

अर्थ : शरीर ही सभी धर्मों (कर्तव्यों) को पूरा करने का साधन है।

परंतु जी दुसरी जमात आहे की, ज्यांना नागरिकशास्त्र कळालेलंच नाही वा त्याची जाणीव सुद्धा नाही आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाचा तर जणू कधी काही संबंधच आलेला नाही. असे लोक मात्र कोणाचीच (अगदी स्वतःची वा स्व-कुटुंबियांची सुद्धा) कोणतीच पर्वा न करता राष्ट्राप्रती कोणतेच कर्तव्ये, संयम, जबाबदारी, नैतिक भूमिका यांपैकी कशाचे वा कोणत्याच प्रकारचे भान न ठेवता बिनबोभाटपणे सर्रास तोंड वर करून बोंबलत फिरत आहेत. त्यांना विज्ञान ही कळालेलं नसल्याने वा वैज्ञानिक दृष्टिकोन हा भूमितीमधील कोनाचा वगैरे प्रकार नसून ती एक विकसित वैज्ञानिक मानसिकता असते हे च मुळात माहीत नसल्याने त्यांच्याकडून कोणत्याच बचावात्मक उपाय, सूचना किंवा बाबींचं काहीच पालनच होत नसल्याचं विदारक चित्र आता सर्वत्रच अगदी ठळकपणे / प्रकर्षाने दिसू लागलेलं आहे. त्यांच्या गर्दभभ्रमणाचा वा नसत्या मर्कटलिलांचा आलेख उत्तरोत्तर वाढतोच आहे. या दुसऱ्या प्रकारांतील अशा बेफिकीर, बेजबाबदार, बेडर, सामाजिक जाणीवेचं कोणतच भान नसलेल्या आणि अप्रत्यक्षपणे देशविघातक वर्तणूक असलेल्या आपल्याच बेलगाम नागरिकांना आता अतिशय कडक शिक्षा झालीच पाहिजे. ती ही प्रसारमाध्यमांच्या उपस्थितीत... दिसू द्या जरा सर्वांना. कारण ही दुसरी जमात स्वतःच्या हट्टी वर्तणूकीने सर्व नियम काटेकोरपणे पाळणारांची मात्र पाचावर धारण बसवत आहेत. सर्व प्रकारची दक्षता बाळगून रहात असलेल्या व अत्यावश्यक कामे वगळता सतत घरांतच बसलेलं असूनही वर उल्लेखित पहिल्या जमातीला हे संपवून टाकतील अशी परिस्थिती आता तयार होऊ घातलेलीच आहे. यावर आता तरी अतिशय गंभीर विचार करून अशा रोमिंग फ्रि सुटलेल्यांवर त्वरित जामर लावला पाहिजे. यांचे गर्दभभ्रमंतीचे व्हायरल नेटवर्क जाम करण्याच्या प्रतिबंधात्मक उपाययोजना आता केल्याच गेल्या पाहिजेत. या बेजबाबदार लोकांत आणि अतिरेक्यांमध्ये फरक तो काय अन् कोणता?? (एक गोळया घालून वा स्फोटकांनी आपल्या नागरिकांना संपवण्याचा प्रयत्न करतो तर दुसरा जाणीवपूर्वक संसर्ग करून करतोय...म्हणजे कृतीची पद्धती वेगवेगळी असली तरी परिणिती वा परिणाम मात्र सारखाच आहे. त्यातही अतिरेकी हा बोलूनच देशाचा शत्रूच असतो. पण दुसरा मात्र

देशाचा सन्माननीय नागरिक आहे. हे येथे विशेषत्वाने लक्षात घ्यावे. त्यामुळे नागरिकाच्या कर्तव्यांशी त्याने एकरूप झालेच पाहिजे. उल्लेखनिय बाब म्हणजे उपरोक्त मूळ मुद्द्यातील दोन्हीही प्रकारांत शिक्षितांबरोबरच निरक्षर/ अशिक्षित/ अर्धशिक्षित या दोन्ही प्रकारचे लोक आहेत. त्यातही सर्वच नियम धाब्यावर बसवून क्षुल्लक वा सहज टाळता येण्यासारख्या कारणासाठी सुद्धा कशाचीही तमा न बाळगता मास्कच्या आडून तोंड लपवत बोंबलत फिरण्यात ७०% पेक्षाही जास्त भरणा हा चांगल्यापैकी तथाकथित शिक्षित (वा निर्लज्ज सुशिक्षित म्हटलं तरीही चालेल) लोकांचाच आहे. म्हणजे या परिस्थितीतही देशाला अगदी जाणीवपूर्वक देशोधडीलाच लावायला वा जनसंसर्गाच्या खाईत लोटायला निघालेल्यांमध्ये वलयांकित शिक्षित / तथाकथित सुशिक्षित लोकांचाच सिंहाचा वाटा आहे. हे आपल्या आजूबाजूला पाहिल्यावर सहजच लक्षात येईल. हा दुर्दैवविलासच नव्हे काय?? (एवढी वर्षे फक्त गुण मिळविण्यासाठीचा एक कः पदार्थ / विषय म्हणूनच नागरिकशास्त्राकडे पहाण्याचा वा ते शिकण्याचा हा परिपाक आहे.) काहीजण तर फेरफटका मारायला आलेले हवसे-गवसे-नवसेही बाजारात फिरताना आढळतायेत. ही समाजासाठी व अर्थातच देशासाठी सुद्धा फारच गंभीर व तेवढीच धोक्याची सुद्धा बाब आहे. हे चित्र (नव्हे व्यंगचित्रच म्हणायला हवं) नाकारून आपल्याला आहे तसच पुढं जाताच येणार नाही. आणि असं पुढं जाऊन काहीच साध्यही होणार नाही. ❊ असं म्हटलेलं वावगं ठरणार नाही. कारण खरा नागरिक कोणत्याही प्रकारे देशाच्या वा नागरिकांच्या भल्याचाच सदैव विचार करेल. स्वतः काही भलं करता येत नसेल तर निदान काही वाईट घडायला हातभार लागणार नाही याची तरी १००% काळजी घेईलच. पण यांपैकी कोणताच वा काहीच सारासार विचार न करता फक्त स्वतःच्या मनमानीने सर्वांनाच संकटात ढकलणाराला आपल्या प्रतिज्ञेशी काहीच देणंघेणं असण्याची मुळीच शक्यता नाही. म्हणूनच त्यांचा पक्का बंदोबस्त अत्यावश्यक आहे. त्यांना सहजपणे भारतीयत्व लाभल्याचा जरासाही अभिमान नाहीच.

दुर्लभं भारते जन्म मानुष्यं तत्र दुर्लभम्!

(अर्थात मनुष्यों के लिए भारत में जन्म लेना सबसे दुर्लभ है। भाग्यशाली है जिन्होंने भारत में जन्म लिया।)

पण या नाठाळांना सांगणार कोण आणि कसं?? म्हणूनच तर आता नाठाळाच्या माथी, हाणू काठी ची हीच योग्य वेळ आहे.

तर एकूणच काय, की एक विकसित राष्ट्र होण्यासाठीची सुरूवात आदर्श नागरी वर्तनातूनच होते. ते आदर्श नागरी वर्तन नागरिकशास्त्रातूनच अंगी भिनलं जाऊ शकतं. हे आपण आताही करू शकतो. फक्त ठरवणं आवश्यक आहे. हे आता लगेच करणं अशक्य वाटत असलं तरीही शक्य आहे. सर्वांनीच प्रयत्न केला तर अजूनही वेळ गेलेली नाही. म्हणतात ना....

कौन कहता है कि आसमा मे छेद हो सकता नही ।<br>
कोई पत्थर तो तबियत से उछालो यारों ।

म्हणून आपल्याला नागरिकशास्त्रापासूनच आता सुरूवात करावी लागणार आहे. कारण नागरिकांच्या वर्तनावरच पुढील इतर अनुषंगिक संसाधनीय बाबींचं असणं वा नसणं फायद्या-तोट्याचं ठरणारं आहे. हे विसरून मुळीच चालणार नाही. आपल्यापैकी बहुतांश लोकांनी कर्तव्यावर असताना स्वतः अनुभवलेली/ पाहिलेली ही सध्याची वस्तुस्थिती आहे...

# तंत्रज्ञानाची दीपावली...



**श्यामसुरेश गिरी**
औसा-लातूर
९९२३०६०१२८

एखाद्या सेवालयात, वद्धाश्रमात, अनाथाश्रमात जाऊन दीपावली साजरी करणा-यांची लगबग सुरु होते.तेथील अनाथ मुलांच्या, वृद्धांच्या चेह-यावर हसु फुलवण्यात त्यांना वेगळीचं धन्यता व समाधान वाटते. मास्क, सॅनेटाईझर, एक मीटर

सोशल डिस्टंस याचीही जोरदार चर्चा ऐकायला मिळते.लॉकडाऊन काळातील गोष्टींची चर्चा करण्यात बरेचं जण रस दाखवतात. दीपावलीत मेणबत्या पेटवुन कोविड रोगाने मृत झालेल्यांना श्रद्धांजली वाहुन शांतीची प्रार्थनाही सुरु असते.गर्दीच जायचे नाही,मास्क वापरा,डिस्टंस ठेवा हे कानमंत्र सतत लक्षात ठेवुन सावधपणे हालचाली वाढतात.आरोग्य सेतू ॲप उघडून आपण सेफ आहोत का? हे पाहण्यात काही जण मग्न दिसतात.

दीपावलीचा सण मोठा
नाही आनंदाला तोटा

सर्व जग ज्या सणाची आतुरतेनं वाट पहातं तो सण म्हणजे दीपावली. प्रसन्नता, मांगल्य,पवित्रता व उल्हासाने दीपावलीतील दिवस भरलेले असतात.सर्वत्र दिव्यांचा लखलखाट असतो. दीपावली म्हणजे प्रकाशाचा उत्सव.आकाश कंदिलाच्या उजेडाने आसमंत उजळुन निघतो. .सुगंधी उटण्याच्या दरवळाने घरातले वातावरण आल्हादायक होते. संत ज्ञानदेवांच्या मते ज्ञानी माणसं दररोज दीपावलीचा आनंद घेतात त्यांचे मन सतत आनंदाने भरलेले व बहरलेले असते.दीपावलीत मग जुन्या आठवणीत नवीन घटनांची,प्रसंगाची भर पडते.दिवाळी अंकांनी तर सकाळच्या फराळाची चव आणखीनचं वाढते.मित्रांच्या व नात्यांच्या भेटीने तर दीपावलीचा आनंद द्विगुणीत होतो.आनंदाचे डोही आनंद तरंग असा प्रत्येक जण आनंद व सुखाचा अनुभव घेत असतो.

मग सुरु होते तंत्रज्ञानाची दीपावली.व्हॉटस अप,फेसबुकवर विविध रंगीबेरंगी शुभेच्छा पत्रांची, स्टिकर्स, व्हिडीओ यांची धुम असते.धुम मचाले धुम या गाण्याची आठवण झाल्याशिवाय रहात नाही.मग आपसुकचं शेअरींग जोरदार चालते.काही जण नवनवीन आपली नवनिर्मिती ,कल्पकता जोरदारपणे सुरु ठेवतात.काही जण Google ने नवनवीन काय-काय Products आणले याची चर्चा करतात व सर्च करतात व ते वापरतात.काही जण ऑनलाईन चॅट व व्हिडीओ कॉल मध्ये गुंग असतात.दीपावली अगोदर झालेल्या ऑनलाईन शिक्षणातील गंमती जमतीची जोरदार चर्चा सुरु असते. amazon किंवा Flipcart वर नवनवीन कोणकोणते गॅझेटस् आले हे सर्च करण्यात व खरेदी करण्यात काही जणांचा वेळ जातो.काही जण या गॅझेटमध्ये न रमता सरळ दूर टूरला जातात.थंडीचा कडाका हळूहळू वाढतो मग बंद पडलेला व्यायाम सुरु करण्याची काही जणांना संधी मिळते. पुनश्च हरिओम. निसर्गात भटकायला- हुंदडायला ,फोटोग्राफी

करायला काही जण पसंती देतात. परंतु रात्रीच्या वेळी दिवसभर काढलेले काही स्पेशल क्लिक फोटो एडीट करुन परत शेअर करण्यात त्यांना सकाळ झालेली समजत नाही.

Kinemaster ,Powerdirector याचाही ते वापर करु लागतात ऑडीओ व व्हिडीओची कापाकापी सुरु होते.शाळकरी मुले ऑनलाईन क्लासेस मधले प्रकल्प करण्यात गुंतलेले असतात.दीपावली गृहपाठ या गोंडस नावाखाली मुलांचे अनेक उद्योग सुरु होतात. U- tube वर आलेले व्हिडीओ डाऊनलोड करुन माझा स्टेटस भारी कसा राहिल यात काही जण सतत गुंतलेले असतात.काही जणांना पतंग बनवण्याची लहर येते तर काही जण आकाशकंदील बनवण्याच्या ऑनलाईन वर्गाला हजेरी लावतात.विविध गेम्स डाऊनलोड करणे व ते खेळणे यात दिवस कसा जातो हे कळतही नाही.सायकली पळवणे व क्रिकेटचा डाव मांडण्याची काहींना लहर आलेली असते.जुनी माणसे धार्मिक ग्रंथाचे वाचन करण्यात धन्यता मानतात. ऑनलाईन वेबसिरिज व न्युज चॅनलवर काही जण रमतात.

दीपावलीत मोबाईलवर संगीताचे मधुर ध्वनी उमटु लागतात.फटाक्यांच्या आतषबाजीने तर आसमंत उजळुन निघते.आवाज करणारे फटाके नको असाही एक सूर ऐकू येऊ लागतो.लक्ष्मीपुजनाला तर दुकाने किती सजलेली असतात ते पाहण्यात वेळ कसा जातो ते कळतही नाही .एखाद्या दुकानात डोकाऊन पाहिले असता CCTV कॅमे-याचे दर्शन होते व तेथील काऊंटरवर Laptop किंवा Desktop चे दर्शन होते.कधी – कधी लॉफींग बुद्धा पण दिसतो.

रंगीबेरंगी चमचमणा-या छोट्या छोट्या दिव्यांचे दर्शन मनोहरी ,विलोभनीय वाटते.सगळीकडे प्रकाशाचा उत्सव असतो भटजींचे कानावर मंत्रोच्चार पडतात सतत मंत्रोच्चार करणारे गॅझेटही हल्ली बाजारात मिळतात. हेडफोन कोणता चांगला? याची मित्रांसोबत जोरदार चर्चा सुरु होते.बाहेरील जगाबरोबर आतल्या जगातही आनंदाचे भरते आलेले असते.गृहिणी You- tube वरील मधुरा रेसिपीज पाहुन नवनवीन पदार्थ बनवतात.कमेंटस देतात व सबस्क्राईब करतात.डीस्क्रीप्शन बॉक्समधील लिंकला टच करुन मसाल्याची ऑर्डर देतात. दीपावली सणा निमित्त मोबाईल कंपन्यांनी डेटाची काय ऑफर दिली आहे याचीही चर्चा व चौकशी सुरु असते. ऑनलाईन बुकींग मध्ये बुकींग सक्सेस स्टोरी सांगणा-याच्या चेह-यावर एक वेगळाचं आनंद पहायला मिळतो.मॉल शॉपीमधील गर्दी पाहुन मन अचंबित होते. रंगीबेरंगी कपड्यांच्या खरेदीला उधाण आलेले असते. या निमित्ताने ऑफरची बरसात सुरु असते. बाजार माणसांनी फुलुन गेलेले असतात. दुकानदारांचा जुना मालही रातोरात संपलेला असतो त्यांच्या चेह-यावर समाधानाची एक लकेर दिसते.काही जणांना मित्राने खरेदी केलेल्या नवीन वाहनावर सैर करण्यात एक वेगळीचं मजा वाटते.

ऐन दीपावलीत मुंबई – दिल्ली सारखी शहरे प्रदुषणाच्या उच्च पातळीवर श्वास गुदमरलेली दिसतात.हवेत धूर( smoke) व धूकं (fog) यांचं मिश्रण होऊन स्मॉग बनतो.एखादा पाऊस पडला की पुन्हा ही शहरं मोकळा श्वास घेऊ लागतात.पावसाने नुकसानग्रस्त झालेल्यांच्या नजरा सरकारकडे आशेनं पाहु लागतात.प्रथम सत्र संपवुन द्वितीय सत्राची चाहुल लागते.खरीप संपुन रब्बी पिकांकडे शेतकरी सरसावलेला असतो. एकंदरित तंत्रज्ञानाच्या दीपावलीत ऑनलाईन व ऑफलाईन शब्दाचा वापर वाढलेला असतो.दीपावली सर्वांकडे आशेने व नवलाईने,कौतुकाने पहात असते सर्वांना मन भरुन आशीर्वाद देत असते.

विशेष...

# महात्मा ज्योतिराव फुले



प्रा.अरूण पवार,
शिरपूर-धुळे
९९७०५२९५७८

जोतीराव त्यांना कधी कधी मदत करित असत. सावित्रीबाई नेहमी त्यांना न्याहारीसाठी भाकरी घेऊन जात असे, जोतीराव मळ्यात वेळ काढून आंब्याच्या झाडाखाली पुस्तक वाचायचे भाकरी खाल्ल्यानंतर जोतीराव, सावित्रीबाई, सगुणाबाई बसले असतांना सावित्रीबाईनी जोतीरावास एक पुस्तक दाखविले व हे पुस्तक मला वाचुन दाखवता का ? पुस्तकातील रंगीबेरंगी चित्रे आवडीने पहायला लागली व जिज्ञासापोटी ते पुस्तक जपून ठेवले होते. सावित्रीबाई निरक्षर होत्या परंतु त्यांना पुस्तकाची आवड पाहून जोतीराव आनंदीत झाले,आज पासून मीच तुला लिहायला, वाचायला शिकविणार व जानाईच्या मळ्यातील आंब्याच्या झाडाखाली भारतातीय स्त्रि शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली गेली.

विद्येविना मती गेली! मतीविना निती गेली ! नितीविना गती गेली !गतीविना वित्त गेले!वित्ताविना शुद्र खचले ! इतके अनर्थ एका अविद्येने केले !

महात्मा ज्योतिराव फुले यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ साली पुण्यात झाला.गोविंदराव हे त्यांचे वडिलांचे नाव तर चिमणाबाई आईचे नाव. जोतीराव एक वर्षाचे असतांनाच त्यांच्या आईचे दुःखद निधन झाले. नंतर गोविंदरावानी जोतीरावांचे संगोपनासाठी आपली मानलेली बहीण सगुणाबाईला बोलावून घेतले. सगुणाबाई पुण्याला आल्यावर जोतीरावांचे चांगले संगोपन करित. पण काही तरी कामधंदा करून गोविंदरावाना आर्थिक मदत करावी असे वाटू लागले त्या विधवा होत्या व त्यांना मुलबाळ नव्हते म्हणून जोतीरावांचे ममतेने संगोपन करित असे. पुढे सगुणाबाई जॉन नावाच्या एका इंग्रज मिशनरी यांच्या घरात मुलं सांभाळण्याचे दायीचे काम करु लागल्या. त्यावेळी जोतीराव फक्त दोन वर्षांचे होते. सगुणाबाई जोतीरावास आपल्या सोबत घेऊन जात असे. जोतीराव दिवसभर जॉन यांच्या मुलांसोबत राहत. त्यांच्या सहवासात त्यांच्या कानावर इंग्रजी शब्द पडायचे. सगुणाबाई निरक्षर होत्या. परंतु त्या ही त्यांच्या सहवासामुळे इंग्रजी भाषा शिकल्या. इंग्रजांच्या घरी जातीभेद नव्हताच व शिक्षणासाठी पोषक वातावरण ही होतं म्हणून जोतीरावांना शिक्षणाचे महत्त्व समजू लागले होते. जोतीराव प्रकृतीने सदृढ असल्याने गोविंदरावानी जोतीरावांना लहुजी वस्ताद यांच्या तालमीत व्यायामासाठी घातले. लहुजी वस्ताद यांच्या तालमीत जोतीरावाने दांडपट्टा, तलवारबाजी,निशाणाबाजी, कुस्ती या मर्दानी खेळांमध्ये तरबेज झाले होते. शुद्रातिशुद्राचा उध्दार करणाऱ्या पहिल्या भारतीय जोतीरावांचे गुरु लहुजी वस्ताद हे अतिशुद्र असावेत हाही नियतीचा योगायोगच म्हणावा लागेल. गोविंदराव आपल्या बागेत काम करित फुलांचा व्यवसाय करित व रिकाम्या वेळेत इंग्रजांच्या घरी फुलबागाचे काम करित असे. त्यामुळे इंग्रजांच्या सान्निध्यात शिक्षणाचे महत्त्व त्यांना पटू लागले. गोविंदराव स्वता: निरक्षर होते.तरी

ही त्यांनी जोतीरावांना शाळेत घालण्याचा निर्धार केला. इंग्रज सरकारच्या शिक्षणविषयक धोरणात्मक निर्णयामुळे त्या काळात कनिष्ठ वर्गातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची दारे खुली होण्याची अंधुकशी आशा दिसू लागली होती. म्हणूनच गोविंदरावानी जोतीरावांना शाळेत घालण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. गोविंदरावाच्या जातीत त्याकाळी कोणी शिक्षण घेतलेला पुरुष नव्हता. ही गोष्ट उच्चवर्गीयांना पटली नाही. धर्म बुडाला धर्म बुडाला अशी ओरड त्यांनी केली व गोविंदरावाना त्रास देऊ लागले शेवटी गोविंदरावानी या त्रासाला कंटाळून जोतीरावांना शाळेतुन काढले. परंतू तोपर्यंत जोतीरावास चांगल्याप्रकारे लिहिता,वाचता यायला लागले होते.व शाळेत त्यांना वाचनाची आवड निर्माण झाली होती व शिक्षणाची ओढ कमी झालेली नव्हती उलट वाचनाचा नाद दिवसेंदिवस वाढत चालला होता. शाळा सुटल्यावर जोतीराव शेतात काबाडकष्ट करून आपल्या वडिलांना मदत करित असे गोविंदरावानी जोतीरावास शाळेतुन काढल्याचे अनेकांना दुःख झाले. त्याच्यात सर्वात जास्त सगुणाबाईस वाईट वाटले व शेवटी सगुणाबाईनी इंग्रज अधिकारी लिजिटसाहेब व गफार बेग यांना जोतीरावांच शाळेतुन काढल्याची बातमी सांगितली. त्यांना ही खूप वाईट वाटले व त्यांनी गोविंदरावांना शिक्षणाचे महत्त्व पटविले व सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले व गोविंदरावांनी जोतीरावास परत शाळेत जाण्यास संमती दिली.एका स्कॉटिश मिशनरी इंग्रजी शाळेत घातले. जोतीरावांना या शाळेत सामान्य माणसाचे बायबल असणारा विख्यात विचारवंत थॉमस पेन यांच्या 'राईट्स ऑफ मॅन' हा ग्रंथ वाचायला मिळाला व या ग्रंथाने त्यांच्या जीवनात अमुलाग्र बदल झाला. एका ग्रंथात माणसाचे वैचारिक जीवन घडविण्याचे किती मोठे सामर्थ्य असते. शिक्षण हे सर्व सुधारणाचे मुळ आहे. समाज प्रबोधनाचे व समाजपरिवर्तनाचे महत्त्वाचे साधन होऊ शकते अशी त्यांना खात्री पटली. शुद्रादि अतिशुद्र व स्त्रिया यांना शिक्षणाची दारे खुली करण्याचा संकल्प जोतीरावांनी केला.जानाईच्या मळ्यात गोविंदराव काम करित. भारतीय स्त्री शिक्षणाचा पहिला विचार त्या आंब्याच्या झाडाखाली उच्चारला गेला. वर्षानुवर्षे अज्ञानाच्या खाईत असणाऱ्या भारतीय स्त्रियांना ज्ञानाच्या नवयुगात आणण्याचा पहिला प्रयत्न आंब्याच्या वृक्षाखाली झाला व पहिली स्त्रियांची शाळा या ठिकाणी सुरू झाली.जोतीरावांनी सावित्रीबाई व सगुणाबाई यांना शिकवले व पुढे मिसेस मिचेलबाई या मिशनरी शैक्षणिक संस्था चालवित होत्या व या संस्थेतुनच त्यांनी सावित्रीबाई व सगुणाबाई यांना उत्तम स्त्रि शिक्षिका बनवले. सावित्रीबाईनी सन १८४७ ला नॉर्मल स्कुलमधुन चौथ्या वर्षाची परीक्षा उत्तीर्ण झाल्या. सावित्रीबाई या देशातील पहिल्या भारतीय ट्रेण्ड शिक्षिका झाल्या म्हणजे भारतातील त्या पहिल्या (अध्यापिका) शिक्षिका झाल्या होत्या.आता जोतीरावांनी शुद्रादि अतिशुद्र व स्त्रिया यांना शिक्षणाची दारे खुली करण्याचा आपला निर्धार प्रत्यक्षात राबवण्यास सुरुवात केली. १ जानेवारी १८४८ रोजी पुण्यातील बुधवार पेठेतील भिडे वाड्यात मुलींची पहिली शाळा सुरू केली व सावित्रीबाई या पहिल्या भारतीय स्त्रि शिक्षिका झाल्या. या शाळेत प्रथम सहा मुलींनी प्रवेश घेतला. एक धनगर, एक मराठा,चार ब्राम्हण मुली होत्या. जोतीरावांना व सावित्रीबाईना सनातन्यांनी खूपच त्रास देण्याची सुरुवात केली.जगाच्या इतिहासात १८४८ हे वर्षे क्रांतीकारक व मानवी जीवनात ऐतिहासिक ठरले कारण अमेरिकेत स्त्रीयांच्या उध्दाराची चळवळ याच काळात सुरू झाली होती.भारतात स्त्री , शुद्राच्या

उध्दार कार्याचा शुभारंभ जोतीरावांनीच केला व हजारो वर्षांपासून अज्ञानाच्या अंधकारातुन ज्ञानाची ज्योत पेटवली व पुढे जोतीरावांनी शतकानुशतके ज्यांना साधी माणुसकीची ही वागणूक मिळत नव्हती अशा उपेक्षित अतिशुद्र महार,मांग यांच्या साठी १५ मे १८४८ रोजी पुण्यातील महार वाड्यात मुला मुलींसाठी एक शाळा सुरु केली. भारतीयांनी अस्पृश्यासाठी हि पहिली शाळा सुरू केली. बॉम्बे गार्डीयन या इंग्रजी वर्तमानपत्रात एका शिक्षण प्रेमी माणसाने आपली प्रतिक्रिया व्यक्त करतांना म्हटले की, महार,मांग यांच्या मुलामुलींसाठी पहिली शाळा काढणारे पहिले भारतीय जोतीराव यांच्या उदात्त हेतूसाठी व शिक्षणाच्या पवित्र कार्याला सावित्रीबाई, सगुणाबाई, फातिमा शेख, सदाशिव गोवंडे, सखाराम परांजपे,मोरो वाळवेकर, लहुजी वस्ताद,मेजर कॅन्डी, नामदार जॉन वॉर्डन,रानबा महार,तात्या भिडे, आण्णासाहेब चिपळूणकर, विष्णू मोरेश्वर भिडे यांचे सहकार्य लाभले. पुढे जोतीरावांनी मोठ्या ध्येयाने प्रेरीत होऊन अत्यंत कष्टाने आपले जीवन शिक्षण कार्यात झोकून दिले व आणखी वंचित घटकांसाठी एकुण अठरा शाळा काढल्या. शाळेतील शिक्षकांना प्रशिक्षण देण्यासाठी भारतात प्रथम नॉर्मल स्कुल (अध्यापक विद्यालय) काढले व चांगले शिक्षकच चांगले विद्यार्थी घडवू शकतात हे त्यांचे विचार लक्षात घेता जोतीरावांचे कार्य किती उल्लेखनीय आहे हे समजते.

माझी कविता..

## लेखणी

*देशभक्तांची जागृत लेखणी*
*कागदावर जेव्हा उमटली*
*भारतीयांच्या निद्रिस्त मनात*
*स्वातंत्र्याची ज्वाला पेटली*

*कवींची सुंदर लेखणी*
*हाती येताच भावुक होते*
*नवरसात अलगद बुडून*
*काव्यरूपाने निर्मळ वाहते*


*शिक्षकांच्या हाती येताच*
*लेखणी मार्गदर्शक बनीं*
*मूल्यांची वैचारिक सरिता*
*छोट्या बालकांमध्ये रुजविते*

*पोलिसांच्या हातातील लेखणी*
*माणसाच्या समस्या सोडविते*
*कधी कोणाला देते न्याय*
*कधी मनाविरुद्धही वागते*

*लेखकांच्या हाती येताच*
*लेखणीला मिळतो मान*
*जनजागृती करण्यासाठी*
*ती लेख लिहिते छान*

*विद्यार्थ्यांच्या हाती लेखणी*
*साक्षरतेची मशाल बनीं*
*सक्षम नागरिक घडविण्यासाठी*
*अविरत परिश्रम घेत असते*

*लेखणीची किमया नि जादू*
*शिक्षक रोजच अनुभवतो*
*तिच्याच साहाय्याने आपण*
*विद्यार्थ्यांना मार्ग दाखवतो*



**नंदा परदेशी,**
धुळे
९६८९९१३३९०

**मराठी मासिक**
**शिक्षणयात्री**
हे मासिक वृत्तपत्र मालक, प्रकाशक,संपादक शैला नंदकिशोर हजारे यांनी मुद्रक सतिष कमलसिंग गिरासे यांच्या मालकीच्या यशवंती ऑफसेट १ ला माळा शिवाजी मार्केट शिरपूर, ता.शिरपूर जि.धुळे ४२५४०५(महाराष्ट्र) येथे छापून ३४, क्रांतीनगर,१ली गल्ली, शिरपूर ता. शिरपूर जि.धुळे ४२५४०५ (महाराष्ट्र). येथे प्रकाशित केले. संपादक -शैला नंदकिशोर हजारे Reg No.

विशेष...

# आजचा शैक्षणिक विचार व गाडगेबाबांचे तत्वज्ञान



डॉ.सतीश तराळ
अमरावती
९८२२५७९५७५

बाबा एक मुक्त विद्यापीठ होतं. देव देवळात नाही. तीर्थस्थळी नाही. माणसात आहे. माणसातला देव बघा माणूस व्हा. माणुसकीच खरा धर्म आहे. अस त्यांच सोप तत्वज्ञान होत. मळ काढणे हा परीटाचा धंदा बाबांनी आपल्या व्यवसायाचे उदात्तीकरण केले व कपडयांचा मळ काढण्याऐवजी महाराष्ट्राच्या मनाचा मळ काढण्याचा प्रयत्न केला.

आचार्य अत्रे म्हणतात जनतेच्या साध्या सोप्या व ओघवती भाषेत बोलणारा महाराष्ट्रात बाबांशिवाय दुसरा वक्ता नाही त्यांनी मूर्तीपूजेचा निषेध केला. त्यांचे तत्वज्ञान सर्वाच्या प्रेमावर आधारलेले समतावादी तत्वज्ञान होते.

आज आपण शैक्षणिक बाबतीत विचार करु लागलो तर शिक्षणातील काही ठळक गोष्टी आपल्या ध्यानात येतात वर्ग दहावी व बारावी मध्ये नापास होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या भरपूर आहे. सध्याच्या शिक्षणात व्यावसायीकरणाचा अभाव आहे. लेखी परीक्षावर वाजवी पेक्षा जास्त भर दिल्याने विद्यार्थी परीक्षार्थी झाला आहे. शाळा व समाज यांच्यामध्ये पाहिजे तसा संबंध नाही. शिक्षणातून लोकशाही साठी योग्य असा नागरीक निर्माण झाला पाहिजे. शिक्षणाच्या आधारे त्याला स्वावलंबनाने जगता आले पाहिजे. सामाजिक प्रश्नात त्याला रस वाटला पाहिजे. अर्थाजनाची मुलभूत तयारी शिक्षणापासून झाली पाहिजे. समाज उपयोगी असे उत्पादक कार्य त्याचे हातून घडले पाहिजे.

१९१९ साली कलकत्ता युनिव्हर्सिटी कमिशनने १०+२+ ३ असा आकृतीबंध सुचवला होता. १९६८ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धारणाचा भाग म्हणून हा आकृती बंध स्वीकारण्यात आला. ईश्वरभाई पटेल समितीनेही शिक्षणात समाजोपयोगी उत्पादक कार्याची शिफारस केली होती. शिक्षण पुस्तकी न राहता उपजीविकेसाठी उपयोगी पडावे. शिक्षणाला व्यवसायिक बैठक प्राप्त झाली पाहिजे. गांधीजींनी सुध्दा आपल्या जीवन शिक्षण पध्दतीत मुल्लोद्दोगाचे महत्व स्पष्ट केले आहे. व कोठेतरी आयोगानेही शिक्षणात कार्यानुभवावर भर दिला होता व १०+२+३ हाच आकृती बंध सुचवला होता. प्राथमिक शाळेत जाण्याचे वय +६ व महाविद्यालयात जाण्याचे वय १८ वर्ष हे आता सर्वसामान्य झाले आहे.

शिक्षण ही वर्तमान कालिन व भविष्यकालिन गुंतवणूक आहे उच्चमाध्यमिक शिक्षणाचे व्यवसायिकरण व उच्च शिक्षणाचा दर्जा सुधारणे ह्या आजच्या शैक्षणिक विचारात महत्वाच्या बाबी आहेत. शिक्षक हा व्यवसाय ते एक व्रत आहे. आपण शिक्षक आहोत याचा शिक्षकाला अभिमान असावा पश्चाताप नसावा.

आजच्या शिक्षण विचारात स्वायत्त महाविद्यालये, अनौपचारिक शिक्षण व मुक्तविद्यापीठाद्वारे शिक्षण या बाबीवर भर देण्यात आला आहे. त्याचप्रमाणे शिक्षण हे स्त्री-पुरुष समानतेवर भर देणारे, वाढत्या लोकसंख्येला आळा घालण्यास उपयुक्त ठरणारे, पर्यावरण रक्षणास साहाय्यभूत होणारे असावे असा

विचार पुढे आला आहे. नैतिक शिक्षण, धार्मिक शिक्षण व आध्यात्मिक शिक्षणाची आवश्यकता सगळ्याच आयोगांनी प्रतिपादन केली आहे. आजच्या अराजकतेच्या व मुल्यऱ्हासाच्या काळात, जिथे भ्रष्टाचार अनाचाराने थैमान घातले आहे. अशावेळी आजच्या शैक्षणिक विचारात नैतिकशिक्षण, धार्मिक शिक्षण, आध्यात्मिक शिक्षण ही आवश्यक बाब आहे.

आजच्या शिक्षणातून राष्ट्रीय एकात्मता, सर्वधर्मसमभाव, स्वयंअध्ययनाची आवड, शरीर स्वास्थ उत्तम ठेवणे भारतीय संस्कृतीच्या वारश्याची जपणुक करणे, भारतीय स्वातंत्र्याचा इतिहास माहित असणे, भारतीय घटनेने दिलेल्या जबाबदाऱ्यांची जाणीव असणे, राष्ट्रीय अस्मितेची जोपासना करणे, जातीयता, विषमता, अंधश्रध्दा नाहीशी करणे ह्या बाबी घडून येणे महत्वाचे मानले आहे. शिक्षणातून वैज्ञानिकदृष्टी निर्माण झाली पाहिजे. डॉ.राधाकृष्ण यांच्या शब्दात सांगावयाचे तर नीतीमान पण चिकित्सक विज्ञानोन्मुखपण आध्यात्मप्रवण माणूस तयार करणे शिक्षणाचे ध्येय आहे. शिक्षणातून मुल्यांचे संस्कार व्हावेत ही मुल्ये वैयक्तिक, सामाजिक व राष्ट्रीय स्वरुपाची आहेत. स्वच्छता, स्वावलंबन, शुचिता, शिस्तप्रियता, कर्तव्यदक्षता, निर्भयता, खिलाडूवृत्ती, श्रमप्रतिष्ठा, विज्ञाननिष्ठा, भूतदया ही वैयक्तिक मूल्ये तर समता, बंधूता, सर्वधर्मसमभाव, सहिष्णुता, सत्यप्रियता, अहिंसा, प्रेम निसर्गप्रेम सहकार्य, न्यायप्रियता, आदरभाव ही सामाजिक मूल्ये. राष्ट्रप्रेम व राष्ट्रीय एकात्मता ही राष्ट्रीय मूल्ये.

या सर्व बाबींना आजच्या शिक्षण विचारात महत्वाचे स्थान आहे. याचा अर्थ शिक्षणाने आजच्या युगाची आव्हाने स्विकारणारा स्वयंपुर्ण नागरिक घडवावा अशी अपेक्षा आहे.

आजच्या शैक्षणिक विचारांच्या संदर्भात गाडगेबाबांचे विचार तपासून पाहिल्यास देशात माणुस घडावा हीच गाडगेबाबांची तळमळ होती असे दिसते. नराचा नारायण करणे त्यांचे ध्येय होते. अंधश्रध्देला त्यांनी कडाडून विरोध केला. व्यसनांचा निषेध केला. अंधश्रध्दा व व्यसने यामूळेच त्यांचे वडील मरण पवले. मरायलाही त्यांचेकडे पैसे राहिले नव्हते. प्रकृती, स्वास्थ गेले होते. हा आत्मानुभव त्यांच्या बालमनावर खोल परिणाम करुन गेला. आयुष्यभर ते अंधश्रध्देच्या विरुध्द लढले. श्रमप्रतिष्ठा त्यांच्या रक्तात भिनली होती. त्यांची आई सखूबाई खूप काम करायची. तिने आपल्या मुलाला डेबूलाही मामाच्या घरी दापूऱ्याला ''बाबू, मानूस गोड नसते, काम गोड असते'' असा कानमंत्र दिला होता.बाबांनी तो आयुष्यभर पाळला. त्यांच्या व्यक्तिमत्वात निर्भयता होती. तिडके सावकारांशी त्यांनी घेतलेली झुंज त्यांच्या निर्भयतेचे प्रतिक आहे. ते अत्यंत शिस्तप्रिय होते. रुणमोचन यात्रेतील भिकाऱ्यांच्या पंगती सुध्दा त्यांना सरळ रेषेत लागत. त्यासाठी ते राखेच्या रेषा आखत व मग पंगत बसवत. सहिष्णुतेचा तर ते मुर्तिमंत अविष्कार होते. अकोल्याला मोरे पेंटरने त्यांना वेडा समजून त्यांच्या तोंडाला रेल्वे डब्यांना द्यावयाचा रंग फासला पण बाबांनी त्याच्या मुली आपल्या मानल्या व त्यांच्यावर प्रेम केले. त्यांच्या मुलींसाठी जावाई शोधला. स्वच्छतेची आवड गाडगेबाबांना होती. बारा वर्षाच्या भ्रमंतीच्या काळात ते नदी लागली की आंघोळ करीत त्यांची दाढी नेहमी व्यवस्थित कापलेली असे. बाबा स्वत: वारंवार दाढ कापत. त्यांची विज्ञाननिष्ठा व वैज्ञानिक दृष्टी तर चमत्कारिक होती. एकदा बाबांनी लोकांना जमीन सपाट करण्याचे काम दिले. लोकांनी जमीन सपाट केली तो पर्यत संध्याकाळ झाली होती. अंधार पडला होता. बाबांनी विचारले झाली काय जमीन सपाट? लोक म्हणाले हो बाबा. बाबांनी एक पणती त्या जमीनीवर ठेवावयास सांगितली. जिथे खडगे होते तेथे अंधारपडला. उंचवट्यावर उजेड. बाबांनी पुन्हा विचारले झाली काय जमीन सपाट? लोक म्हणाले नाही. बाबापुढे त्यांनी माना खाली घातल्या 'स्पिरीट लेव्हल' या उपकरणाऐवजी बाबांनी नव्याच यंत्राचा शोध लावला होता. त्यांच्य किर्तनातून

ते चमत्कारांचा, पोथीनिष्ठेचा निषेध करीत.

म्हाताऱ्या जनावरांना कसायाकडे विकण्याचे काम पडू नये म्हणून त्यांनी गोरक्षण काढले. भूत दया त्यांच्या अंत:करणात वसत होत. दर्यापूरला रेडे कापण्याची प्रथा होती, बाबांनी ती बंद करण्याचा प्रयत्न केला. बहिरम यात्रेत बकरे कापण्याच्या प्रथा होती, बाबांनी ती बंद करण्याचा प्रयत्न केला. बहिरम यात्रेत बकरे कापण्याच्या प्रथेला त्यांनी पायबंद घातला. अनेक ठिकाणी ते पशूबळी विरुध्द लढले. किर्तनातून पशूबळी प्रथेचा उपहास केला. पशू सुध्दा परमेश्वराचीच लेकरे आहेत. पशू पक्ष्यांना अभय द्या. याचा त्यांनी प्रचार-प्रसार केला. तिडके सावकारांचे हृदयपरिवर्तन झाले रुणमोचनचा घाट बांधून द्यायला ते तयार झाले. बाबांनी त्यांचे पैसे स्विकारले नाहीत. बाबा म्हणाले. पैसे तुमच्या जवळच राहू द्या. आम्ही खर्चाच्या पावतया पाठवू तुम्ही पैसे चुकवा. स्वत:च्या मुलीला, पत्नीलाही त्यांनी आपल्या मोठेपणाचा फायदा घेऊ दिला नाही. गोर गरीबांना हजारो ब्लॅकेटस् वाटली पण कुटूंबियाना त्यातील एकही दिले नाही. समता तर त्यांच्यात पूर्वी पासूनच वास करीत होती. दापूऱ्याला मामाकडे असतांना ते गुरे राखायचे काम करीत तेव्हाही त्यांचा एक महार गुराखी मित्र होता त्यांच्यासह ते सहभोजन करीत. भजनात त्याचे सहाय्य घेत भटकंतीच्या काळात मी महार आहे असे भासवून विहिरीतील पाणी काढल्या बद्दल त्यांनी भरपूर मारही खाल्ला. पंढरपूरला दलीतांसाठी चोखामोळा धर्मशाळा बांधली. स्वत:च्या घरी मुलीचा जन्म झाला तेव्हा परीट समाजात दारु मटन देण्याची जी प्रथा होती ती मोडून लाडूचे जेवण दिले व वाईट प्रथा मोडली.

स्त्रीपुरुष समानतेचा एक भाग म्हणून त्यांनी हुडा प्रथेला विरोध केला. कमी खर्चाच्या लग्नांचा पुरस्कार केला. कर्ज काढून लग्न करु नका असा उपदेश केला. वेळेचे त्यांना अत्यंत महत्व होते. ते स्वत: अठरा-वीस तास काम करीत. त्यांचे जेवण अतिशय कमी व साधे असे चटणी-भाकरी ते खात. त्यांनी किर्तनाची नवी शैली शोधून काढली. बोलीभाषेचा व व्यवहारातील दाखल्यांचा त्यासाठी उपयोग केला. परिवर्तनाचं व प्रबोधनाचं प्रचंड सामर्थ्य त्यांच्या कीर्तनात होत.

असा त्यांनी मूर्तीपूजेला विरोध केला. श्रीखंड चांगले की बकरी? अश्या सारखे प्रश्न कीर्तनातून विचारुन त्यांनी मांसाहार निषिध्य मानला. अस्पृश्यतेचा, शिवाशिवीचा आपल्या कीर्तनातून खरपूस समाचार घेतला. अस्पृश्यता भारताचा डाग आहे असे प्रतिपादन केले. गांधीच्या आधी खराटा हाती घेऊन ग्रामसफाईचे कार्य केले. सकाळी खराटयाने गावातील व रात्री कीर्तनाने डोक्यातील घाण साफ केली. आजच्या शिक्षणात सेवाभाव महत्वचा मानला जातो. बाबांनी स्वत:च्या आचारणातून त्याचा प्रसार-प्रसार केला. श्रम, सेवा, स्वच्छता, स्वावलंबन व शिक्षण या शिवाय जनतेचा उध्दार होणार नाही असा उपदेश त्यांनी आपल्या कीर्तनातून सतत केला. ज्या नैतिक व आध्यात्मिक शिक्षणाची आवश्यकता सतत प्रतिपादली जात आहे व ज्याच्या अंमलबजावणी बद्दल मतभेद आहेत. ते शिक्षण बाबांनी आपल्या कीर्तनातून प्रभावीपणे दिले विद्यार्थ्याच्या क्षमतांचा विकास करुन त्यांच्या क्षमतांचा उपयोग समाजासाठी होईल असे व्यक्तिमत्व व चारित्र्य निर्माण करणे हा आजच्या शिक्षणाचा प्रमुख विचार आहे. हेच कार्य बाबा आपल्या कीर्तनातून करीत असत. दुर्गुण, व्यसने, अंधश्रध्दा, व्रतवैकल्ये, नवस सायास सोडा प्रत्येक माणसात परमेश्वर आहे याची जाणीव ठेवून प्रत्येकाशी प्रेमाने वागा असा त्यांचा उपदेश असे. मूल्यांचा प्रसार हे शिक्षणाचे मुख्य उद्दिष्ट बाबांनी मूल्यांचाच प्रसार केला. मानवी मने सुसंस्कारित करणे ही शिक्षणाची जबाबदारी त्यांनी स्विकारली. सर्वधर्मसमभाव, राष्ट्रप्रेम, राष्ट्रीय एकात्मता या गोष्टीचे अप्रत्यक्ष संस्कार त्यांनी केले. आजच्या शैक्षणिक विचाराशी बाबांच्या तत्वज्ञानाचे जवळचे नाते आहे.

संधीचे सोने..

# शिकणं आणि शिकवण्यासाठी..



**भावेश सोनवणे**
नंदुरबार
९६२३१३०८४२

इ.स.१६६५ ते १६६७ या काळात जगात प्लेगच्या महाभयंकर साथीमुळे जगातील सर्व विद्यापीठे दोन वर्ष बंद ठेवण्यात आली होती. गुरूत्वकर्षणाचा शोध लावणारे थोर शास्त्रज्ञ सर आयझॅक न्युटन त्यावेळी शिकत होत या दोन वर्षाच्या काळात त्यानी घरात बसुनच गणित, भौतिकशास्त्र, खगोलशास्त्राचा खुप अभ्यास केला याच काळात त्यांना गुरूत्वकर्षणाची माहिती मिळाली गुरूत्वकर्षणाचा त्यांनी शोध लावला आणि जगाने ते मान्य केले. सर आयझॅक न्युटन म्हणतात. 'जर मी काही मौल्यवान शोध लावले असतील तर त्यांचे सर्व शोध माझ्या बुद्धिमत्तेला नसुन स्वयंपूर्वक लक्ष देण्याला आहे.' या प्रमाणे विद्यार्थींनी संयमाने अभ्यास केला पाहिजे.

शिकवणे व शिकविणेसाठी विद्यार्थी, पालक व शिक्षक यांना विनम्र आव्हान

सर्व विद्यार्थी, पालक व शिक्षक यांना विनम्र आव्हान आहे कोविड-१९ लॉकडाऊनच्या काळात शाळा बंद आहेत किती तरी दिवसापासून तुम्ही घरीच आहात त्यामुळे शाळा कधी सुरू होतील. वर्गातील सर्व मित्राना कधी भेटायच ही आतुरता तुम्हा विद्यार्थ्यांना आहे हे आम्हाला माहिती आहे. पालकांना प्रश्न पडला असेल की आता माझ्या पाल्यांची अभ्यासाची लिंक तटेल? असे अनेक विविध प्रश्न तुमच्या समोर आहेत. सर्व शिक्षक, पालक, विद्यार्थी यांना आमचे एक आव्हान आहे फार विचारात न पडता स्वत:चा आत्मविश्वास कमी होऊ न देता जोमाने तणावमुक्त अभ्यास करावा. तुमचे वर्ग शिक्षक तुम्हाला ऑनलाईन शिक्षणाच्या माध्यमातून तुमच्या मदतीला आहेतच ते तुमच्या अभ्यासाची काळजी करीतच आहेत. आज आपल्याला सिद्ध करण्यासाठी संधी मिळालेली आहे. त्या संधीच सोन करण हे आपल्या हातात आहे.

इ.स.१६६५ ते १६६७ या काळात जगात प्लेगच्या महाभयंकर साथीमुळे जगातील सर्व विद्यापीठे दोन वर्ष बंद ठेवण्यात आली होती. गुरूत्वकर्षणाचा शोध लावणारे थोर शास्त्रज्ञ सर आयझॅक न्युटन त्यावेळी शिकत होत या दोन वर्षाच्या काळात त्यानी घरात बसुनच गणित, भौतिकशास्त्र, खगोलशास्त्राचा खुप अभ्यास केला याच काळात त्यांना गुरूत्वकर्षणाची माहिती मिळाली गुरूत्वकर्षणाचा त्यांनी शोध लावला आणि जगाने ते मान्य केले. सर आयझॅक न्युटन म्हणतात. 'जर मी काही मौल्यवान शोध लावले असतील तर त्यांचे सर्व शोध माझ्या बुद्धिमत्तेला नसुन स्वयंपूर्वक लक्ष देण्याला आहे.' या प्रमाणे विद्यार्थींनी संयमाने अभ्यास केला पाहिजे.

घरच्या अभ्यासात शिक्षकासोबत पालकांची भुमिका फार महत्त्वाची आहे. प्राथमिक व माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या अभ्यास घेत असताना प्रथम

आनंदमय वातावरण निर्माण करून आवश्यक ती सर्व काळजी घेऊन कोरोनापासून भयमुक्त होणे आवश्यक आहे. तंत्रज्ञानाचा वापरातून उदा. दिक्षा ॲप, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन परिषद, पुणे यांनी तयार केलेले विविध ॲप तसेच युट्युबचा वापर करून आपल्याला विद्यार्थ्याला अभ्यास घेता येईल आपण आपल्या पाल्या समवेत रममाण होऊन सोशल अंतर ठेऊन अभ्यासा सोबत कॅरम, बुद्धीबळ यासह पारंपारिक घरातील खेळ खेळावे जेणे करून शैक्षणिक व आपले वैयक्तिक आयुष्यही ताण तणाव मुक्त राहील.

सध्या शिक्षकांनी व्हॉटस ॲप ग्रृप तयार करून विषयनिहाय, दररोज गृपमध्ये अभ्यास देवून मार्गदर्शन करावे तसेच ऑनलाईन मुल्यमापन विद्यार्थ्यांचे घेण्यासाठी विविध संकल्पना राबविण्याचे प्रयत्न करावे. आपल्या सर्वच विद्यार्थी व पालकाकडे ॲन्ड्रॉईड मोबाईल राहणार नाही विशेषता त्याकरिता आपण पालकांशी सोशल डिसटन्स ठेवून वेगवेगळ्या तंत्रज्ञानाचा वापर करून विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात जोडून ठेवण्याचा प्रयत्न करावा आणि शासनाच्या आदेशाचे पालन करत विद्यार्थ्यांना ज्ञानदानाचे काम शिक्षक बंधु-भगिनी यांनी अविरत करावे शिक्षक, पालक व विद्यार्थी यांना त्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी फार फार शुभेच्छा.

माझी कविता..

## साद

*माये तुला साद*
*घालताच...*
*दुथडी वाहू लागते*
*पाणीच पाणी..*

*त्याचा अथांग*
*तळ गवसतो*
*मन उगाच व्याकुळत*
*आतल्या आत*
*गुदमरू लागतं...*

*दिसतं पाणीच पाणी*
*पिण्याला थेंबही नाही*
*घशाला पडते कोरड*
*उलट इतरांचीच ओरड*

*सारखं असचं होतं बघ*
*जगण्याचं भान सुटू*
*लागलेलं, मनही...*
*बावरून थिजू लागलेलं..*

*पायतळी माती*
*तीही हादरते*
*अशावेळी माये*
*तुलाच साद*
*घालावीशी वाटते!*

**प्रतिमा इंगोले.**
**९८५०११७९६९**

## सीमोल्लंघन

*सीमोल्लंघन करून भेटू*
*मानवतेच्या गावला*
*स्नेह-जिव्हाळा सोने वाटू*
*हिंदू-मुस्लिम भावाला....*

*विविध रंगी गुलाब,झेंडू*
*असा असावा गंध-दरवळ*
*निळ्या नभाचा पानोपानी*
*धुंद सुखाचा हिरवा परिमळ..*

*असेच होऊ फुले आपण*
*चमन आपूले एक असावे*
*येशू-अल्लाह-बुध्द-महावीर*
*नमन आपूले एक असावे....*

*नकोच मत्सर जरा कुणाचा*
*एक दुजा साथ करू*
*आली संकटे किती जरीही*
*मिळूनी त्यावर मात करू....*

**-अनिलकुमार बा.होळकर.**
**९८९०००१०४६**

# 'आबाची गोष्ट'

आबा महाजन यांचे बालसाहित्य हे विविधस्वरूपी आहे. खानदेशी बोलीतील त्यांच्या प्रयोगशील कविता वैशिष्ट्यपूर्ण ठरल्या आहेत. आबाची गोष्ट या कथासंग्रहरूपाने वाचकभेटीला येत आहेत. या संग्रहातील कथा नावीन्यपूर्ण आहेत. मुख्यत्वे शाळकरी मुलांच्या भावविश्वाच्या या कथा आहेत. संस्कार वा बोधकथा असे त्यांचे स्वरूप आहे. ग्रामीण, निमशहरी असा या कथांचा चित्रणप्रदेश आहे. प्रतिकूल अवस्थेत धडपडणारी, परिस्थितीशी दोन करणारी, प्रामाणिक, जिद्दी मुलांच्या या संघर्षकहाण्या आहेत. या मुलांच्या जोडीला पालकांचे एक जग त्यांच्या भल्या-भुऱ्यासह या कथांमध्ये चित्रित झाले आहे. या किशोरवयीन मुलांच्या चित्रणात प्रेरक दृष्टी आहे. सामाजिक सहिष्णुता, समता, सत्य, सचोटी आणि चांगुलपणा या तत्वांचा आविष्कार करणारी दृष्टी या गोष्टींमध्ये आहे.

कोणताही समाज हा कथनप्रिय असतो. त्यातही बालमनाला गोष्टीचे आवाहन हे सर्वव्यापी असते. यातील बहुतांश कथा या आत्मपर स्वरूपाच्या कथनतंत्रातून उलगडलेल्या भावकथा आहेत. महाजन यांच्या या कथांचा आटोप हा अतिशय संक्षेपी स्वरूपाचा आहे. गद्य अतिशय प्रवाही आणि अल्पाक्षरी आहे. तर, सांगायचा मुद्दा हाच की, या तऱ्हेचे संभाषित हे सतत बोलण्याच्या पातळीवरचे आहे. खानदेशी परिसरनिष्ठ संवाद आणि अकल्पित उद्‌भवणारे नाट्य यांनी या शाळकरी कथांना वेगळे गद्यपरिमाण प्राप्त करून दिले आहे.

-डॉ.रणधीर शिंदे




पुस्तकाचे नांव-आबाची गोष्ट
लेखक - आबा गोविंदा महाजन
प्रकार - बाल-कुमारकथासंग्रह
प्रकाशन वर्ष -२०१७
प्रकाशक- दिलीपराज प्रकाशन,पुणे
२५१ क,शनिवारपेठ पुणे ३०
(०२०२४४८३९९५)
पाने-१०४
मूल्य- १००/-

Reg No. MAHMAR2015/67226 शिक्षणयात्री Postal Registration No.DHL/557/2018-20










# सहकार्याचे विनम्र आवाहन...

शिक्षण यात्री मासिक नियमित प्रकाशन करताना होणारी आर्थिक कसरत पहाता आपणांस वर्गणीदार होऊन शिक्षण यात्री मासिकास आर्थिक स्थैर्य मिळवून देण्याची कळकळीची विनंती!!!!

वार्षिक वर्गणी- ३५० रूपये द्विवार्षिक वर्गणी - ७०० रूपये त्रैवार्षिक वर्गणी-१००० रूपये

शिक्षण यात्री या नावाने चेक/मनीआर्डर पोस्टाने पाठवू शकतात.

Online पेमेंट साठी--- खाते नाव-शिक्षणयात्री Shikshanyatri

बँक ऑफ बडौदा (राष्ट्रीय कृत) No--13320200000322 Ifsc-BARB0SHIRPU

With pay any app

**....वर्गणी पाठविल्यास पत्ता व जमा पावती बाबत कळविणे....**

संपर्क पत्ता- संपादक शिक्षण यात्री क्रांतीनगर मुपोता-शिरपुर जि-धुळे ४२५४०५

(मोबा.८२०८३०१००१/९८५०९६४६०१)

Postal Registration No.DHL/557/2018-20

प्रेषक
संपादक -२९,क्रांतीनगर,१ली गल्ली,
शिरपूर ता.शिरपूर जि.धुळे
भ्रमणध्वनी : ८२०८३०१००१

प्रती, ..................................................
..................................................
..................................................

Pragati Arts Shirpur 8421356261